म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १६५८

सन १९६५

# मराठी मुशायरा

वा. वा. पाटणकर

REFBK-0014823
REFBK-0014823

मूल्य ३॥ रु.

# मराठी मुशायरा

वा. वा. पाटणकर

# मराठी मुशायरा

वा. वा. पाटणकर

मूल्य ३५ रु.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........
REFBK-0014823

# म रा ठी मु शा य रा

वा. वा. पा ट ण क र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत
अनुक्रम ३८३५५ दि. ७।५५
क्रमांक १६५८ नों. दि. २६।३।५५
नों. दि.
REFBK-0014823
REFBK-0014823

मूल्य ३॥ रु.

प्रकाशक :

वा. वा. पाटणकर, वकील
यवतमाळ.

मुद्रक :
ब्रह्मानंद नाडकर्णी
स्वस्तिक हाउस,
५२५, तुळशी पाईप रोड,
दादर, मुंबई २८

# समर्पण

उर्दू भाषेइतकीच मराठी भाषा जोमदार आहे,
मराठी कवि–हृदय तितकेंच जिवंत आहे,
मराठी काव्य प्रतिभा तितकीच हृद्य,
चमत्कृतिपूर्ण, सूक्ष्म आणि तरळ आहे
आणि मराठी शायर " वाहवा " " बहोत
अच्छा " च्या बरसातींत, तितकाच बेधुंद
गाऊं शकतो या प्रात्यक्षिकाचा अनुभव
घेणाऱ्या माझ्या रसिक श्रोत्यांस, " शेरो
शायरी " या काव्य प्रकारांतील ही माझी
दुसरी आणि अखेरची कलाकृति सादर
समर्पण करीत आहे.

वा. वा. पाटणकर

78423

# चिराग

आमचे मित्र भाऊसाहेब पाटणकर ' मराठी शायरी ' नंतर वाचकांना ' मराठी मुशायरा ' पेश करीत आहेत. वाचक त्या ' मुशायऱ्यांत ' सहभागी होण्यापूर्वी ' चिराग ' ' पानदान ' इत्यादींची तयारी केल्याखेरीज मुशायऱ्याला रंग भरणार नाहीं, एवढ्या पुरतीच या चार पानांची कामगिरी आहे ! एरव्ही ' शायरी ' च्या प्रस्तावनेंत व ' गोमन्तवाणी ' च्या खास अंकांत आम्ही या अभिनव काव्य–प्रकाराबद्दल आणि त्याच्या जनकाबद्दल जे लिहिलें, तें परिचयादाखल पुरेसें आहे. आणखीहि एका दृष्टीनें आम्हाला ही प्रस्तावना लिहिताना अडचण वाटत आहे. पाटणकर यांच्या या कविता संग्रहांत समानशीलतेमुळें जो सहजच प्रवेश करील, त्याला प्रस्तावनेची फारशी गरज नाहीं; अन् भिन्नगोत्रीय विद्वानांना अशा छोट्या प्रस्तावनेनें भागण्यासारखेंहि नाहीं ! या वेगळ्या ढंगाच्या काव्यांतील 'आत्मरंगा'वर आणि त्यामागील भूमिकेच्या वेदान्तावर या ' मुशायऱ्या ' एवढेंच स्वतंत्र पुस्तक लिहावें लागेल !

श्री. पाटणकर यांच्या 'मराठी शायरी' पूर्वींहि एक 'मराठी शायरी' अस्तित्वांत होती. ती म्हणजे लावण्या व पोवाडे यांची. त्या शायरीत उमदेपणा, मोकळेपणा, भोगप्रेम आणि वीरप्रशंसा यांचे राज्य होते. यमकादि शब्दालंकारापलीकडे ज्यांच्याजवळ फारसा ऐवज नव्हता, त्या पंडीत कवीपेक्षां हे जुने शाहीर काव्यदृष्ट्या खास श्रेष्ठ होते. परंतु उर्दु शायरी आणि ही रांगडी शायरी एक नव्हे. उर्दू शायरीत जो अभिजात विलासिपणा आणि दरबारी अहंकार आहे, तो लावणीच्या उतावीळ कामुकतेंत नाहीं;पण मराठी शायरीहून उर्दू शायरी जितकी वेगळी तितकींच पाटणकरांची शायरी उर्दू

शायरीहून वेगळीं आहे, असा मला या खेपेच्या वाचनांत भास झाला. अर्थात पाटणकरांच्या शायरींत मूळ बैठक व ‘ आरोहावरोह ’ उर्दू शायरीचेच असले तरी ‘वर्ज्यावर्ज्य’ सूर वेगळे आहेत असे दिसून येईल. या वेगळेपणाचेंच येथें थोडेफार दिग्दर्शन झाले तरी पुरें आहे.

उर्दू शायरींत दुःख अथवा दर्द भरपूर आढळेल तर उलट पाटणकरी इष्कांत दुःखाला जागाच नाही कीं काय, असा भास होईल.उर्दू शायरीत आत्म-गौरवाला भरपूर जागा आहे, पण तो गौरव प्रेमाचा आणि प्रेमीकाचा, ‘आशकी ’ चा आणि ‘ आशका ’ चा, असेल. तर पाटणकरांच्या काव्यांतील आत्मगौरव हा प्रज्ञेचा आणि प्रज्ञावंताचा आहे, असा भास होईल. पाटणकर स्वतःच सांगतात. “ यांत नुसती विषयोन्मुखताच नव्हे, तर विषय-लंपटताहि आहे, पण ही प्रज्ञावंताची... विषयलंपटता आहे. ”

उर्दू कवीला आपल्या आर्ततेचा, दुःखाचा, आणि हृदयावरील जखमांचाहि अभिमान असतो; पाटणकर यांना आर्ततेंतहि शाबूद राहिलेल्या बुद्धिमत्तेचा आणि अभिमानाचा अभिमान आहे ! शुद्धीवर असलेला मनुष्य प्रेम करूं शकेल काय ? आणि प्रेम करणारा मनुष्य शुद्धीवर राहू शकेल काय ? हे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. पण त्या प्रश्नांचें उत्तर ज्याच्या त्याच्या प्रेमाच्या आणि जागृतावस्थेच्या व्याख्येवर अवलंबूनच राहील. न्याय आणि वेदान्त यांचा अभ्यास केल्यानें पाटणकर यांच्या प्रेमकाव्यांत वेगळाच निःस्पृह-पणा शिरला आहे, असें मला त्यांच्या काव्याच्या दुसऱ्या वाचनांत वाटूं लागलें. पण ही गोष्ट अजाणता होऊन गेलेली नव्हे. पाटणकर म्हणतात, “ मराठी शायरीतील इश्कविषयक दृष्टि कांहीं निराळी असावयास पाहिजे. स्वतःच्या सम्मानाशीं विसंगत असा इष्क येथें दिसणार नाहीं.

*तुम्हारे हारसे बाँसी जो फूल हो साहेब*
*मज़ारे आशिके नाशाद्दुपर चढा देना ॥*

( बाईसाहेब ! तुमच्या हाराचें उरलेलें निर्माल्य, या हताश आशकाच्या कबरीवर चढवा ! )

या ओळींत दिसून येणारें अनन्य आणि अगतिक प्रेम पाटणकरांच्या स्वाभिमानाला परवडणारें नाहीं.

“ *तुम्हारे हाथसे मौत आये, ऐसी किस्मत कहाँ मेरी ?* ”

या फर्हादच्या उद्गारांत शीरीनच्या खंजिराला कुर्बान होण्याची जी तयारी दिसते, ती पाटणकरांना पसंत पडेल कीं नाहीं, कोण जाणे ! ते आपल्या या ' मुशायऱ्यांत स्पष्टच म्हणतात.

*हंसतील ना कुसुमें जरी, ना जरी म्हणतील ये,*
*पाऊल ना टाकूं तिथें, बाग ती अमुची नव्हे ॥*
*भ्रमरापरी सौंदर्यवेडे आहों जरी ऐसे अम्ही*
*इष्कांतहि नाहीं कुठें भिक्षुकी केली अम्ही ॥*

पाटणकर यांच्या या स्वाभिमानांत मर्दानी ऐट नाहीं, असे कोण म्हणेल ? पाटणकर प्रत्यक्ष जीवनांत नैयायिकहि आहेत व शिकारीहि आहेत. अर्थात त्यांनीं बगीच्यांतील कुसुमांनाहि सर्कशींतील श्वापदाप्रमाणें नजरेच्या जरबेंत ठेवण्याचा ' पण ' केला, तर नवल नाहीं ! पण करारी पुरुषहि जिथें ' बेकरार ' बनतात, शूर पुरुषहि जिथें लहान मुलाप्रमाणें अश्रू ढाळतात, तिथेंच प्रेमाच्या साम्राज्याची हद्द सुरू होते. या रडण्याला आणि ' बेकरारी ' ला पाटणकर दैन्य का समजतात, हे आम्हां उर्दु काव्याच्या भक्तांना कळणार नाहीं. इश्कांतील दैन्य हें दैन्य नसून वैभव असते—कीं जसे बालकांच्या अंगसंगतींत जडलेलें मालीन्य म्हणजे मलिनता नसून वैभव असतें. * याची अस्फुट जाणीव पाटणकरांनाहि आहे. पण त्यांचा वेदान्ती कठोरपणा त्यांना ते कबूल करून देत नाहीं. ! पाहा—

" ना म्हणूं इश्कांत कोणी पाऊलहि टाकूं नका
फक्त आपुल्या विकलतेला दीनता मानूं नका
सौंदर्य तर या दींनतेचे भोगावयाचें असतें इथें
ऐसे नव्हे कीं दैन्य नुसते भोगायचें असतें इथें

प्रेमाखातर पत्करलेल्या दैन्यांतहि सौंदर्य असतें. येथपर्यंत ज्याची प्रेमानुभूति पोहोंचली त्यानें विकलता आणि दीनता यांतील श्लेष काढीत बसणे म्हणजे स्वाभिमानाचे संरक्षण करीत बसल्यानें आलेली कातरता तर नव्हे ?

वस्तुस्थिति अशी आहे कीं प्रेमाच्या अमलांतील गर्वाढ्यताहि स्वनिर्मितच असते. अन् लीनताहि [ दीनता नव्हे ! ] स्वखुषीची असते. एकदां खुषीचा सौदा म्हटल्यावर, प्रिय व्यक्तीला तख्तावर बसवून आशकानें हाती

---

*धन्यस्तदंगरजसा मलिनीभवंति । ( शाकुन्तल )* *

मोर्चेल घेतले म्हणून कमीपणा तो कुठला ? अद्वैत वेदान्ताच्या अभ्यासकाला प्रेमांतील हें अद्वैत एवढें अवघड कां वाटावे ? मला वाटते स्वामी रामतीर्थांनीं आपल्या व्याख्यानांत एके ठिकाणी ऑलिव्हर गोल्डस्मिथच्या चरित्रांतील एक हकीकत दिली आहे. जॉन्सन्च्या सुविख्यात 'लिटररी क्लब' मध्ये नेहेमी वादविवाद व कोटीला प्रतिकोटी चाले हें प्रसिद्धच आहे. गोल्डस्मिथला एकदां असें स्वप्न पडलें कीं, जॉन्सनचा आणि आपला कडाक्याचा वाद झाला, आणि त्यांत जॉन्सनच्या कोटीक्रमाला उत्तर देतां न आल्याने आपण हरलो. या बौद्धिक पराभवानें गोल्डस्मिथ स्वप्नांतच इतका बेचैन झाला कीं, तो ताडकन् जागा झाला. केव्हां एकदां क्लबमध्यें जातों, आणि जॉन्सन्चा कोटिक्रम खोडून काढतो, असें त्याला झालें !

पण तो अद्याप पुरता जागा झालेला नसावा ! कारण क्षणभरानें ' आणखी जागा ' झाल्यावर तो स्वतःलाच मनमुराद हंसला. आणि म्हणाला, " अरे ! मी वेडा तर नव्हे ! स्वप्नांतील जॉन्सन्चे कोटिक्रम म्हणजे गोल्डस्मिथच्याच मेंदूनें केलेले कोटिक्रम नव्हेत का ? मग माझा पराभव जॉन्सन्नें केला नसून मी स्वतःच केला आहे ! अर्थात मानखंडनेचा प्रश्नच नाहीं !"

प्रेमांतील अहंकार संपून जेव्हां प्रेम पूर्ण जागृत बनतें, तेव्हां त्याला स्वतःचें असेंच हंसू येतें !

पण पाटणकर यांचा हा ' शेरसंग्रह ' म्हणजे केवळ एकाद्या प्रेमिकाचे काव्योद्गार नव्हेत. जीवनांतील विविध महत्त्वाचे अनुभव त्यांना सारखीच स्फूर्ति देतात. जन्म, मरण आणि प्रेम हे तीन सनातन काव्यविषय आहेत, असें म्हणतात. पाटणकर यांच्या या काव्यसंग्रहांत अशाच प्रमुख अनुभवांभोवतीं स्फुट चतुष्पदिका गुंफलेल्या आढळतील. प्रत्येक चतुष्पदिकेच्या स्वयंपूर्णतेमुळें एकीकडून भर्तृहरीच्या शतकत्रयांचें स्मरण होईल, तर दुसरीकडून उमरखय्यामच्या रुबायांचें स्मरण होईल. पाटणकरांच्या शृंगार ' शतका' नंतर ( ' शतक ' शब्द भर्तृहरीच्या काव्याचें साहचर्य दाखविण्यापुरताच येथें अभिप्रेत आहे ) त्यांचें ' जीवन ' शतक सुरू होतें. जीवनासंबंधींचें त्यांचें चिन्तन केवळ रूढ आणि पुस्तकी नाहीं. किंबहुना त्यांच्या 'प्रीतिशतकां'हूनहि या 'जीवितशतकां' त वास्तवता अधिक जाणवते; कल्पना आणि वेदान्त कमी आढळतो. अर्थात् जीविताचा विचारहि जीवितप्रेमाच्या रूपानें येणें, हें काव्यस्वभावाला धरूनच आहे. चमत्कृति

आणि विरोधाभास हा पाटणकरांच्या काव्याचा, नव्हे, चिन्तनाचाच आत्मा आहे. उर्दू काव्याचा आत्माहि पाटणकरांच्या मतें चमत्कृतिपूर्ण मांडणींतच आहे.

जीवितप्रेमासंबंधीं ते म्हणतात.

> *"मृत्युची छाया जशी ही स्पष्ट होऊं लागली*
> *तेव्हां कुठें या जीवनाची ओढ वाटूं लागली"*

या अनुतापप्राय जीवित–प्रेमातहि पाटणकरांचा निडरपणा आणि वेदान्त त्यांना सोडीत नाहीं. त्यामुळें या भागांतील त्यांच्या चतुष्पदिका भर्तृहरीच्या श्लोकांना जास्तींत जास्त जवळच्या वाटतात. त्यांच्या वृत्तींतील निःसंगपणांतहि त्यांचा कल्पनाविलास टिकून राहतो, नव्हे, चढत जातो! याचीं अनेक उदाहरणें देण्याचा मोह होतो; पण एकच पुरें—

> *भोगिले ऐश्वर्य तें ही, आहे तुम्ही जें भोगिलें*
> *भोगिलें जास्तीच आम्ही,—बरबादिचेंही भोगिलें।*
> *राखेंतली या धुंद आहे, फक्त दोघां समजली*
> *समजली आम्हांस, आणी शंकराला समजली!॥*

जीवितचिन्तनरूप चतुष्पदिकांनंतर ईश्वराकडे फिर्याद नेणाऱ्या चतुष्पदिका सुरू होतात. त्यांतहि स्वाभिमानाची गुर्मी आणि अभिनव कल्पनांचा विलास यांचा इतरत्र आहे तसा मिलाफ आहेच! किंबहुना हा मिलाफ हाच पाटणकरी शेरांचा 'फॉर्म्युला' होय, असे म्हणतां येईल. ईश्वराला हा बेगुमान 'नवकवि' फर्मावितो;

> *"जाणतों याला जरीं ओशाळला नसतास तूं*
> *लपलासहीं नसतास ऐसा निर्गुणाच्या आड तूं*
> *केली क्षमा आम्हीच आम्हां ही करावी लागते*
> *करण्या क्षमा दुसऱ्यास भगवन्! माणूस व्हावें लागतें!॥*

येथें विदग्ध वाचकांना उमरखय्यामच्या

> Oh thou, who men of base Earth didst make
> And who with Eden didst devise the Snake

For all the sin wherewith the Face of Man
Is blackened, Man's forgiveness give-and take

—या विख्यात रुबाईचें स्मरण होईल !

कांहीं चतुष्पदिकांत कवीनें अश्रूंची महती अशा अभिनव कल्पनांनीं गायिली आहे कीं, काव्यांत कल्पनावैभवाला महत्त्व देणारे लोक तो भाग डोक्यावर घेऊन नाचतील.

*समजूं नका हीं आसवें नयनांतुनी जीं वाहतों*
*अस्तास माझ्या यौवनाच्या अर्घ्य आम्ही वाहतों*
*जाणतों हा सूर्य आतां उगवायचा नाहीं पुन्हां*
*जीवनाची वेल आतां बहरायची नाहीं पुन्हां*
*आतां तमाशी गांठ आहे येथून आमुची व्हायची*
*आतां परीक्षा पौरुषाचीं येथेंच आहे व्हायचीं*

या ओळी अनेक दृष्टींनीं पाटणकरांच्या विशिष्ट परिणत शैलीच्या प्रातिनिधिक आहेत. सूर्य, अर्घ्य, तमस् इ. अस्सल संस्कृत कल्पनांबरोबरच, यमकाचा उर्दू ढंग आणि जीवनाचा भार पेलण्यांतील खास पाटणकरी 'दिलेरी' या मुळें या ओळी खास पाटणकर संप्रदायी वठल्या आहेत. जीवनांतील बेडर वृत्ति काव्यरचनेच्याहि वाट्याला आल्यानें, किरकोळ भाषादोष आणि वृत्त दोष यांचे खडेहि पाटणकरांच्या सुग्रास कल्पनाविलासाच्या केशरीभातांत मिसळलेले आढळतील !

निराशा, संकटें, मृत्यु यांच्याकडे पाहूनहि हंसणारा हा कवि थट्टेच्या 'Mood' मध्यें केवढा बेछूटपणा दाखवीत असेल याची कल्पना करतां येईल. पण बेछूटपणांतहि या कवीनें आपली तत्ववेत्त्याची पायरी व इभ्रत सोडलेली नाहीं, हे 'वात्रटिका' लिहिण्याच्या आजच्या युगांत लक्षांत घेण्यासारखे आहे.

अखेर पाटणकरांच्या कवितेची जात कोणती आणि देणगी ( Contribution ) कोणती ? भक्तिमार्गी (प्रेमाची) शायरी, आणि ज्ञानमार्गी (प्रज्ञेची) शायरी असे दोन प्रवाह मानले तर उर्दूतहि हे दोन प्रवाह आहेत. महंमद इक्बल यांची कविता प्रेममार्गापेक्षां ज्ञानमार्गानेंच अधिक गेली आहे. अहंकार आणि वेदान्त या दोंन वैशिष्ट्यांत पाटणकरांची कविता मीर दाग, गालिब यांच्या-

पेक्षां इक्बालला अधिक जवळ आहे. परंतु इक्बालच्या काव्यांत फ्रेडरीक नीत्शेच्या संस्कारांनी असो, की इस्लामच्या आवेशांनें असो, मुसलमान समाज आणि मानव समाज यांच्यासंबंधींचा उत्तुंग ध्येयवाद आढळतो. त्या मानानें पाटणकरांचा अहंकार आणि वेदान्त व्यक्तिवादी वाटतो.

पण वृत्तीतील 'दिलेरी' व त्या दिलेरीच्या ऐटींतून निघालेला अभिव्यक्तीचा नखरा, हे पाटणकरी शायरीचे विशेष होत. स्वतःला 'नव' म्हणविणाऱ्या पिढीला जीवनोपभोग, बंडखोरपणा आणि रचनेंतील बेपर्वाई हें आपलें वैशिष्ट्य वाटत असेल, तर पाटणकर त्यांचे उस्ताद ठरतील! पण—

—पण अकारण सौंदर्यद्वेष आणि अर्थशून्य अनुकरण हीच जर आजच्या नवसंप्रदायाची वैशिष्ट्यें असतील तर नवकवी आणि पाटणकर यांचें नाते नाहीं. पाटणकरांचे आप्त, भर्तृहरि आणि उमरखय्याम हेच होत! याखेरीज त्यांचे कोणी 'अज्ञात सखेसोयरे' असले, तर ते कालाच्या उदरांतून यथाकाल प्रगट होतीलच!

—श्री. के. क्षीरसागर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... दि.
विभाग ... नों. दि.
क्रमांक
नों. दि.

# नि वे द न

शायरी काव्य-प्रकारांतील 'मराठी मुशायरा' हें दुसरें पुस्तक वाचकांस अर्पण करून मी साहित्याच्या या क्षेत्रांतून समाधानाने निवृत्त होत आहे. शायरीच्या निर्मितीची एक वेगळीच नशा आहे. तिच्या धुंदीत कोणी कोठपर्यंत असावें हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे.

उर्वरीत आयुष्यांतील बराच मोठा काळ मी या काव्य परिश्रमांत घालविला. आतां अत्यंत दुःखानें याचा निरोप घेऊन माझ्या आवडीच्या अशा दुसऱ्याहि एका छंदाकडे वळावयाला हवे.

मराठी काव्यांत दिसून येणारी रूक्षता, नीरसता, दुर्बोधता आणि कल्पनाशून्यता मनाला सारखी टोंचत होती. याउलट उर्दू शायरींतील मोहिनी मनाला बेधुंद करीत होती. मराठी काव्याला जर कांहीं वेगळे रूप दिलें नाहीं; त्यांत जर जीवनाची धुंद दिसली नाहीं आणि अत्यंत आकर्षक अशा सौंदर्याचा आविष्कार जर या काव्यांत आढळणार नाही तर उर्दू शायरीची "नखरेल नार" आमचा काव्यरूप संसार उध्वस्त केल्याशिवाय राहणार नाहीं अशी मला साधार भीति वाटत होती.

"चौदहवी का चाँद" किंवा "अब क्या मिसाल तू" सारख्या काव्यपंक्तींखेरीज आज दुसऱ्या कोणत्या मराठी काव्यपंक्ती आमच्या तरुण पिढीच्या जिभेवर आहेत? तरुण पिढीला उगीच नांवे ठेवणें मला पसंत नाहीं. वरील काव्ये उत्तान शृंगाराची खात्रीनें नाहींत आणि आमची तरुण पिढी मुळींच बहकलेली नाहीं. या तरुण मनाला ज्या सौंदर्याची तहान

लागली आहे ती भागविण्याचें सामर्थ्य आमच्या काव्यांत नाहीं एवढेंच मी म्हणेन.

मराठी काव्यावरील या माझ्या विधानाबद्दल पुष्कळांना राग येईल हे मी जाणतो. पण तसें झाल्यास एका असाहित्यिकाचें हे विधान आहे असे समजून विद्वानांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करावे एवढेच मी म्हणेन. मला काय दिसतें आहे एवढेच मी सांगत आहे. काव्य विषयाबद्दल असाहित्यिकाचा असा एकादा दृष्टिकोनहि विद्वानांच्या कानावर असावा एवढेच मला वाटतें. आमच्या काव्य सृष्टीकडे मी कसा बघतो आहे हें मी नम्रपणे नमूद करीत आहे. काव्यांतल्या या रूक्षतेची जाणीव आमच्या कविवर्गालाहि नव्हती असे नव्हे; ही रुक्षता काढून टाकण्याचे खूप प्रयत्न केले गेले. त्यांतूनच भावगीतांची उत्पत्ति झाली असें मला वाटतें. काव्यांतील अंतर्गत सौंदर्याची उणीव आतां सुंदर चालीने किंवा एखाद्या गायिकेच्या गोड आवाजाने भरून काढण्याचा यत्न सुरू झाला. अपवादात्मक अशी कांहीं भावगीतें वगळल्यास आमच्या आधीच असलेल्या काव्यदोषात आणखी एका दोषाची-स्त्रैणपणाची भर पडली. भावगीतेंहि आकर्षक होईनात, तेव्हां आमचा कविवर्ग आणखी घाबरल्यासारखा झाला. त्याने अत्यंत दुर्बोध अशा काव्यनिर्मितीला सुरुवात केली आणि त्या ऐटींत आमच्यासारख्या असाहित्यिकाच्या बुद्धिमांद्याला तो आतां निःशंकपणें हंसू लागला. कांहीं केलें तरी काव्यामध्यें हवे ते सामर्थ आणि सौंदर्य उत्पन्न झालें नाहीं.

**किं कवेः तस्य काव्येन किं कांडेन धनुष्मतः।**
**परस्य हृदये लग्नम् न घूर्णयति यच्छिरः॥**

या पंक्तींत वर्णन केलेला काव्यप्रकार निर्माण करतां आला नाही. तेंच जें आपल्या काव्याला साधलें नाही तेंच नेमकें उर्दू काव्यांत सहज लीलेने साधले आहे. श्रोत्यांकडून सहजोत्स्फूर्त प्रतिसाद मिळविण्याचें हें सामर्थ्य नक्की कशांत आहे याचा विचार केला गेला नाही. उर्दू काव्यांत हें सामर्थ्य आहे आणि त्याचमुळें मैफिल रंगून जाते ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची आहे. कुठे मुशायरा आणि कुठे आमची कवि-सम्मेलने ?

मराठी कवि-सम्मेलनांतून दिसून येणाऱ्या या प्रतिसाद शून्यतेला दुर्दैवाने मराठी श्रोतेच जबाबदार धरले गेले. काव्यांतील सौंदर्यहीनतेवर पांघरूण घालण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. तसेंच कांहींच नसता प्रतिसाद देण्याची उर्दू श्रोत्यांना संवयच आहे असा त्यांच्यावर आरोप करून उर्दू काव्य हे वस्तुतः मराठी काव्यापेक्षां सुंदर नाहीं अशीहि समजूत निर्माण करण्यांत आली. वास्तविक पाहिले असतां असे मुळींच नाहीं. मुळांत जर सौंदर्य असेल तर त्याचें स्वागत करण्याकरितां उर्दू भाषिकाइतकाच मराठी भाषिकहिं अधीर असतो हा माझा अनुभव आहे. श्रोत्यांमधील रसिकतेबद्दल एकदां हे मत गृहीत धरल्यास आमच्या काव्यांत कांहींतरी कमी आहे हें मानणें प्राप्त आहे. उर्दू काव्यांतील हा सौंदर्यविशेष प्रथम कै. माधवराव पटवर्धन यांच्या लक्षांत येणें स्वाभाविक होते.

तें सौंदर्य मराठी काव्यांत उतरविण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. या प्रयत्नाच्या अपयशाकडे लक्ष न देता केवळ त्या प्रयत्नावरच खूष होऊन मी त्यास पहिला मानाचा मुजरा करून माझे पहिले 'मराठी शायरी' हे पुस्तक त्यांच्या स्मृतीसच अर्पण केले. साहित्याच्या क्षेत्रांत कौतुक करण्याची ही रीत असते. एकाद्या काव्याचे यशापयश दैवाधीन असते. कधी कधी काव्यनिर्मितीच्या मागे असलेला कवीचा उद्देशहि आदरार्ह असतो. मराठी भाषेत तेच सौंदर्य निर्माण करीन या माधवरावांच्या महत्वाकांक्षेसच आम्ही पहिल्याने प्रणाम केला आणि त्यांचीच जिद्द उराशी बाळगून या काव्य-परिश्रमास सुरूवात केली.

कै. माधवरावजींचे हे परीश्रम यशस्वी तर झाले नाहींतच, पण त्यांचा एक वाईट परिणाम झाला. कै. माधवरावांसारखा सहृदय आणि प्रज्ञावंत या प्रकारांत अपयशी ठरल्याबरोबर अशा तऱ्हेच्या काव्यनिर्मितीला मराठी भाषाच असमर्थ आहे असा भ्रम उत्पन्न झाला. इतरहि कवींनी उर्दू काव्यांतील गझलसारख्या वृत्तांचा अंगिकार करून पाहिला, पण उर्दू काव्याची लज्जत त्यांत येऊं शकली नाहीं. मराठी भाषेच्या असामर्थ्याचा हा दुसरा पुरावा मानला गेला. उर्दू शायरीचे मराठींतील अनुवाद आपण वाचतो. हा मराठी अनुवाद उर्दू अनुवादित शेराच्या मानाने नीरस वाटतो—हाहि मराठी भाषेंतील वैगुण्याचा तिसरा पुरावा म्हणून स्वीकारण्यांत आला.

मराठी भाषेवरील हे आरोप प्राणपणानें नाशाबीत करणाऱ्या अशा सन्मान्य माणसाची दखल कांहीं वेगळ्या रीतीने घ्यावयाला हवी होती, असें म्हटल्याशिवाय मला राहवत नाहीं.

साहित्यिकांकडून या काव्याबद्दल कांहीं आस्थेने विचारपूस होईल असे मला वाटले होते. मराठी काव्यांतला हा एक नवीन ढंग दिमाखाने आणि आत्मविश्वासाने आविष्कृत करणाऱ्या माणसास उपेक्षेशिवाय खात्रीनेच कांहीं जास्त मिळावयास हवें होतें.

मराठी विद्वानांबद्दल तर बोलायलाच नको. उर्दू शायरीची वारेमाप स्तुति करण्यांत रंगून गेलेले हे विद्वान मराठीच्या या भ्रमाचाच एक प्रकारें पुरस्कार करूं लागले. सामान्य मराठी भाषिक मराठी भाषेंतील या दैन्याला मान्यता देऊन आपल्या सौंदर्याची तहान भागविण्याकरितां उर्दू काव्याकडे बघूं लागला. त्याचें दृश्य स्वरूप म्हणजेच आमच्या तरुण पिढीला वाटणारे उर्दू काव्यांचे आकर्षण होय. हा सर्व भ्रमनिरास नुसती व्याख्याने देऊन झाला नसता. याला प्रत्यक्ष कृति हवी होती. शायरीची निर्मिती करून मराठी भाषेत तितकाच जोम आहे, मराठी प्रतिभा ही तितकीच रम्य आहे, मराठी हृदय तितकेच 'जिंदादील' आहे, आणि मराठी श्रोता सौंदर्याचे स्वागत करण्याला तितकाच उत्सुक आहे, हें दाखवून देणें एवढेंच माझ्या परीश्रमाचे प्रयोजन होते आणि ते सफल झाल्यानंतर या क्षेत्राची कृतकृत्यतेच्या समाधानानें मी रजा घेत आहे. मी साहित्यिक नव्हे; आणि या क्षेत्रांत फार दिवस राहण्याइतकी साहित्यिकांची सृष्टि आकर्षक आहे असें मला वाटत नाहीं. तरीहि अशा सृष्टींत मला जो कांही पाहुणचार मिळाला तसा फार थोड्यांच्या भाग्यांत असतो.

एकाद्या सुंदर कलाकृतीची उपेक्षा करण्यापलिकडे साहित्यिक किंवा साहित्यसभा यांचे काहीं वेगळें अवतारकार्य आहे असें मला वाटत नाहीं. याबद्दल मला तिळमात्र खेद नाही. मराठी भाषिकांतील काही एका विशिष्ट पातळींतील लोकांचा हा स्वभावविशेष आहे हे न समजण्याइतका मी वयाने लहान नाही. मोठमोठ्या वाघांशीं आमना सामना शिकार करून जेव्हां तो मृत वाघ यवतमाळला आणला जाई तेव्हां असल्या धाडशी शिकारीबद्दल साधी विचारपूसहि न करण्याचा संयम आमच्या ' बाररूम ' मधील

शेकडा नव्वद वकिल दाखवित असत. अशी विचारपूस करण्यांत आपल्याला शिकाऱ्याच्या धैर्याची दखल घ्यावी लागेल ही त्यानां भीति वाटत असेल, पण हा पांढरपेशा वर्ग सोडल्यास आम जनता या शिकारीबद्दल सादर कौतुक दाखवीत असे. मला तोच अनुभव साहित्याच्या क्षेत्रांत साहित्यिकांबद्दल आला. हे मी नमूद करण्यांत मला याबद्दल कांही विशेष वाटते असे नव्हे. याची जाणीव मला अगोदर पासूनच होती, आणि एवढ्याच करिता माझ्या शायरीचे कदरदार म्हणून मी फक्त दोघांकडेच दृष्टि लाविली होती.

मला आत्मविश्वास होता कीं साहित्यसमीक्षक याची कदर करतील. त्याचप्रमाणें सामान्य श्रोते या काव्यप्रकाराचे स्वागत करतील ही मला खात्री होती. माझी अपेक्षा अक्षरशः माझ्या बंदुकीच्या नेमाइतकीच अचूक होती. वर वर्णन केलेल्या साहित्यिकांनीं माझा मुळींच अपेक्षाभंग केला नाहीं, कारण त्यांकडून मला अपेक्षाच नव्हती. आणि जी होती ती सफलच झाली असे मी म्हणेन. मराठीं भाषेंत शेरो शायरी तितकी रमणीय वाटत नाहीं अशा तऱ्हेचे विधान एखादा विद्वान करून जाण्याचा संभव आहे, हे मीहि जाणून होतो. मराठी भाषेच्या या असामर्थ्याचा उल्लेख करणारा एक बहाद्दर निघाला. माझ्या पुस्तकावर आलेल्या परिक्षणांकडे मी फार लक्षपूर्वक बघत असे. आणि या सर्व परिक्षणांकडे पाहून मला अतिशय संतोष वाटला. सुंदर कलाकृतींचें स्वागत करावयास उत्सुक असलेला एवढा विशाल महाराष्ट्र पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं ? मराठी भाषेवरील या असामर्थ्याच्या विधानाला प्रत्यक्ष मराठवाड्यांतच कार्यक्रम करून मी उत्तर दिले आहे. उर्दू भाषा समजणारेच नव्हे तर उर्दू काव्यांत आकंठ निमज्जन करणाऱ्या श्रोत्यांकडून मिळालेली साद हे वरील विधानाला समर्पक उत्तर आहे.

मराठी भाषेत शेरो शायरीला आवश्यक असा जोम आहे किंवा नाहीं, हा आता: वादाचा प्रश्न उरला नाहीं. मराठी भाषेचें हें सामर्थ्य जर वादातीत आहे तर मराठी भाषेत हा प्रकार कां निर्माण झाला नाहीं किंवा कां यशस्वी झाला नाही एवढेंच संशोधन करून पाहण्यासारखें आहे. हा काव्यविशेष

म्हणजे नक्की काय आहे याची सुस्पष्ट कल्पना कवींना झालेली नव्हती असे मी नम्रपणें म्हणेन.

शेवटी कोणीतरी या काव्य-विशेषाबद्दल व्याख्या करणें जरूर आहे. ती एकदां करून बघितल्यावर मराठींतहि तसा प्रकार आणण्यास आवश्यक ते सुस्पष्ट ज्ञान होईल. मी या काव्य विशेषाची खालीलप्रमाणें व्याख्या करतो.

**भावोन्मादोत्थित कल्पनाचमत्काराविष्कार विशेषः शायरी।**
**कल्पना चमत्कृतित्वंतु विस्मय सहकृत सद्भिव्यंजकत्वं॥**

उत्कट भावनेतून निर्माण झालेल्या सद्भिव्यंजक अशा विस्मयकारक कल्पनेच्या आविष्काराचें एक तंत्र असा मी वरील व्याख्येचा सामान्यतः अर्थ लावतो. वरील लक्षण तंतोतंत लागू पडणारा हा " जफर " चा शेर पहा

**उन हशरतोंसे कह दो कहीं और जा बसे**
**इतनी जगे कहा है दिल दागदारमे॥**

दर वेळीं निराशेने व्यथित झालेल्या हृदयाला आता एखादी नवीन आशाहि करणे किती कठीण असते, हें सत्य किती रम्य कल्पनेच्या आधारे सांगितले आहे ते बघा.

वरील व्याख्येंत मी रचना तंत्रावर जोर दिला आहे हे आपल्या लक्षांत येईल.

शायरीचे खरे सौंदर्य जसे विस्मयकारक कल्पना-वैभवांत आहे तसेंच ते रचना–तंत्रांतहि आहे. प्रतिभेची देणगी ही परमेश्वराची देणगी आहे. हिच्याबद्दल ऐट मानणे चुकीचें आहे. एखादा अति सामान्य शायरहि एखाद्या प्रसंगी शायर श्रेष्ठ गालीबलाहि कसा मागे टाकील याचे उदाहरण मी एका व्याख्यानांतून दिलेले होते. हे वरील तंत्र जरी सांभाळले तरीहि शायरीची लज्जत उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. हे तंत्र नसल्यास उत्कृष्ट कल्पनाहि तितकी हृदय खेचून घेणारी होत नाही, या तंत्राचा अवलंब केल्यास काय होते ते बघा. कविवर्य श्री. मनमोहन नातू यांच्या एका सर्वश्रुत काव्यपंक्तीस मी शेरो शायरीची वेषभूषा देत आहे. ही देण्यांत मी मूळ भावार्थ किंवा अभिप्राय मुळीच बदलत नाही. राधेची मैत्रिण विनोदाने

राधेला हा प्रश्न विचारते—

**कसा ग बाई झाला, कुणी ग बाई केला,**

**राधे तुझा सैल अंबाडा**

वेषभूषा बदलून उर्दू वेषांतला हा शेर पहा—

**सांग वा सांगू नको, सारे अम्हाला समजतें**

**सैल व्हाया केंस, कांहीं और व्हावें लागतें.**

हे तंत्र न साधल्यामुळें कै. माधवरावजी शेरो शायरीत यशस्वी होऊं शकले नाहीत. अखेरपर्यंत कांहीं समजूं न देता विस्मयकारक रीतीनें शेवटच्या चरणार्धात सत्याचा स्फोट करणें हें एकच तंत्र शेरो शायरीत सांभाळावे लागते. उर्दू काव्याचे सौंदर्य याच लहानशा साध्या गोष्टींत आहे. हेच माझे संशोधन आहे. काव्यांत इतरहि काव्यगुणांचा आविष्कार असावा लागतो हे खरे; पण या तंत्रावरच शायरीचे सर्व बल अवलंबून आहे. हे तंत्र न साधल्यामुळेंच मराठी अनुवादित शेर नीरस दिसतात. आणि यामुळेंच उर्दू काव्याच्या तुळनेने आमचे काव्य दिलखेचक वाटत नाहीं. आणि दुर्दैवाने मराठी भाषेवरच वर सांगितल्याप्रमाणें आरोप केले जातात. तंत्राइतकाच दुसरा महत्त्वाचा शायरीतील काव्यगुण म्हणजे अर्थसुलभता होय. आणि त्यामुळेंच सामान्य श्रोत्यापासून तो विद्वानांपर्यंत हे काव्य सर्वांनाच आकर्षक झाले आहे.

यानंतर एका गोष्टीचा उल्लेख करून मी हे निवेदन संपवीत आहे.

शायरी काव्यप्रकाराची एकदा वर सांगितल्याप्रमाणे व्याख्या ठरविल्यास ती व्याख्या लागूं पडेल अशी सुंदर काव्यसंपदा आपल्या संस्कृत वाङ्मयांत आहे. हे खरे की त्या काळांत आत्मनिष्ठ काव्याचा तितकासा आदर नव्हता. पण शेरो शायरी हे केवळ वैषयिक काव्य नव्हे. या काव्याचा कोणताहि विषय असूं शकेल. भावनेच्या पार्श्वभूमीवर सत्याभिव्यंजक कल्पनेचा विकास म्हणजे शायरी होय.

संस्कृतांतील शायरी-सदृश काव्याचे मी नमुन्याकरिता खालील उदाहरण देत आहे.

भुक्ते मयि प्रथमत्सि फलानि वत्स
सुप्ते करोषि शयनं मयि जीवति त्वं ।
प्राणान् जहासि सुरलोक सुखाय किं वा
सापत्न भाव महह प्रकटीकरोषि ॥

अशी अनेक उदाहरणे देतां येतील. ज्ञानेश्वरीसारख्या काव्यांत तर तुम्हाला पदोपदी शायरीच वाचतो असा भास होईल. तुळशी रामायणांतहि या काव्यप्रकाराची अनेक उदाहरणे देतां येतील. ही गोष्ट खरी, कीं केवळ याच प्रकाराच्या मागे आमचे प्राचीन कवि लागले नाहींत; पण त्यांनी हा प्रकार खात्रीने हाताळला आहे. हे सर्व विवेचन व्याख्यानाव्यतिरिक्त करता येणे शक्य नाही. मी तर असे म्हणेन की शायरी या काव्यप्रकाराचे जनकत्व प्राचीन संस्कृत कवींकडेच आहे.

'मराठी शायरी' आणि 'मराठी मुशायरा' ह्या दोन्ही पुस्तकांत मराठी हा शब्द मी भाषेच्या दृष्टीने न वापरतां संस्कृतीच्या अर्थाने वापरला आहे. मराठी शायरी म्हणजे मराठी भाषेंत शायरी निर्माण करणे नव्हे. ज्या संस्कृतीत आमचा पिंड वाढला आहे त्याच संस्कृतीचे विश्व आपण येथे बघाल. उर्दू काव्यांतील विश्वाहून आमचे विश्व वेगळे आहे. आणि म्हणूनच मय मय कहा साकी, सैयाद, कफस, शमा, परवाना, या विश्वाला मी माझ्या काव्यात स्पर्शहि केला नाही.

या प्रतीकाशिवायहि आमच्या विश्वांत कांहीं वेगळे सौंदर्य आहे. कांहीं उल्लू शेरो शायरी सोडल्यास आपणास सगळीकडे मराठी भाषिकाचेंच सांस्कृतिक विश्व दिसेल. शायरी काव्यप्रकारांत प्रयत्न करणाऱ्या माझ्या सर्व तरुण मित्रांना मी एवढेच सांगेन की, हा प्रकार हाताळतांना गुलामगिरीचा स्वीकार करूं नका. तुमच्या भाषेबद्दल अभिमान बाळगा. तुमच्यांत हवी तितकी 'जिंदादिली' आहे. तुमच्या भाषेंत हवा तितका जोष आहे. तुमच्या प्रतिभेत सामर्थ्य आहे, इतकेच नव्हे तर या काव्य प्रकाराचे जनकहि तुम्हीच आहात.

हे निवेदन संपण्यापूर्वी प्रा. श्री. के. क्षीरसागरांचे आभार मानल्याशिवाय मला राहवत नाहीं. एखाद्या वाङ्मयीन कृतीचे खरें मूल्यमापन

साहित्यरसिकांशिवाय होणें शक्य नाहीं. कलाकृती सुंदर असल्यास ती सुंदर आहे असें म्हणण्याचा प्रांजलपणाहि साहित्यसमीक्षकास असावा लागतो. माझ्या मागील पुस्तकाला व याहि पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझ्या पहिल्याच प्रयत्नाचे महाराष्ट्र सरकारने पुरस्कार देऊन जें कौतुक केलें त्यामुळें मला फार समाधान वाटलें. सर्वसामान्य श्रोत्याकडून एकाद्या कलाकृतीचे योग्य स्वागत होण्यास मुळीच अडचण नसते. कारण त्याच्याकडून कलाकृतीची उपेक्षा होण्यास इतर कांहीहि कारण नसते. कलावंताला उत्साहित करण्याचें महान कार्य हा वर्ग करीत असतो. महाराष्ट्रांतील या विशाल रसिक श्रोतृवर्गाचे आभार मानण्यास मीहि विसरणे शक्य नाहीं. शायरीसारखे नाजूक काव्य निर्माण करणाऱ्याबद्दल अशीच वृत्ति त्यांनीं कायम ठेवावी एवढीच मी या वर्गाला नम्रपणें प्रार्थना करतों. कारण याच वर्गाला ही प्रार्थना करण्यांत कांहीं अर्थ आहे.

माझीं दोन्ही पुस्तकें अतिशय अल्प वेळांत व तरीहि उत्तम तऱ्हेनें छापून दिल्याबद्दल श्री. दि. मु. नाडकर्णी यांचाहि अत्यंत आभारी आहे.

# प्रास्ताविक

[ शायरी हा एक जीवनोन्मुख काव्यप्रकार आहे. यांत नुसती विषयोन्मुखताच नव्हे तर विषय लंपटताहि दिसून येते. पण ही प्रज्ञावंताची, प्रतिभावंताची विषय लंपटता आहे. आणि त्यामुळें या काव्य प्रकाराला एक दर्जा प्राप्त झाला आहे. असे असले तरीहि या प्रकाराचें काव्य निर्माण करीत असतां मराठी भाषिकाला तरी थोडे ओशाळल्यासारखे वाटणें स्वाभाविकच आहे. या आंतरिक जाणिवेवरचा हा ' शेर ' पहा ]

१ सुजनता माझी मला ही निर्भत्सिते वरच्यावरी
मीही असा वस्ताद तिजला चोरून करतो शायरी.

[ आंतरिक टोचणीचा प्रतिकार असा केल्याशिवाय शायरीच्या श्रोत्यांसंबंधी कांहीं स्पष्ट कल्पना असाव्या लागतात. शायरीचे श्रोते कसे असावेत यावरची ही रूबाई पहा. ]

२ उन्मेष ज्यांच्या यौवनाचा कांहीच ना झाला कमी
प्यायले जे खूप ज्यांना वाटे परी झाली कमी
निर्मिली, मी फक्त माझी, त्यांच्याच साठी शायरी
सांगतो इतरास " बाबा " वाचा सुखे ज्ञानेश्वरी.

[ श्रुति स्मृति पुराणोक्त मार्गानें जो आपल्या नाकासमोर चालला आहे त्याबद्दल शायराला आदराप्रमाणें कींवही वाटते. ]

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम..... अनुक्रम.....
क्रमांक..... विभाग..... वि.....
क्रमांक..... नों. दि.....
वाचनालय शाखा.

३ आसवे नयनांत ज्याच्या चमकली नाहीं कधी
काळजाचा दर्द ज्याला माहीतही नाहीं कधी
बर्बादिचे ऐश्वर्य ज्यानें जन्मात नाहीं पाहिलें
शांती मिळो आत्म्यास त्याच्या, काय त्यानें पाहिलें

[ शायरी हे आदर्शवादी काव्य नव्हे. यांत जीवनाची नशा आहे. आमच्या काव्यांचे साधें स्वरूप सांगणारा गझल पाहा– ]

४ सांगेल कांही भव्य ऐसी शायरी माझी नव्हे.
तो कवींचा मान, तितुकी पायरी माझी नव्हे.
आम्ही अरे साध्याच अपुल्या जीवना सम्मानितों
सम्मानितों हासू तसे या आंसवा सम्मानितों
जाणतों, अंती अम्हाला मातीच आहे व्हायचें
नाही तरी, दुनियेंत दुसरें काय असतें व्हायचें
मानतों ना देव आम्ही, कोठे कधी ऐसे नव्हे,
मानतों इतुकेंच, कीं तो आमुचा कोणी नव्हे,
आहो असे बेधुंद अमुची धुंदही साधी नव्हे
मेलों तरी, वाटेल मेला, दुसरा कुणी, आम्ही नव्हे.

[ जीवनांत अशी बेहोषी असली तरी आमचें जीवनविषयक एक तत्त्वज्ञान आहे. निवृत्ति, वैराग्य किंवा निष्कामता याचाहि आम्ही आदर करतों. मात्र हें वैराग्य विषयतृप्तिनंतरचें हवें. विषयविन्मुखता जशी त्यागानें तशीच भोगानेहि होते. असें शास्त्रवचन आहे. “ त्यागेन वा भोगेन क्षयः ” दुसऱ्या प्रकारच्या वैराग्यावरील ही रूबाई बघा. ]

५ “ सम्मानिले वैराग्य आम्ही शृंगारही सम्मानिला
अंकावरी येथे रतीच्या, बुद्ध आहे झोपला
विसरला दुनियेस अपुल्या गुंजनाही विसरला
कमल कोषीं भृंग आतां, कमलासही त्या विसरला

हें हवें वैराग्य, आम्हा निष्कामता ऐसी हवी
तैसी नको नुसतीच जेथे दाढी हवी लुंगी हवी

[ हा काव्यप्रकार निर्माण केल्यावर या काव्यप्रकाराची साहित्यिकांकडून त्यांच्या नेहमीच्या संवयीप्रमाणें उपेक्षा केली जाईल ही शंका आम्हालाही होती. शायरीच्या सौंदर्याबद्दल आम्हाला विश्वासहि होताच. आम्ही आमची शंका आणि विश्वास सर्वश्रेष्ठ उर्दू शायर गालीब याचेपाशीच प्रगट केला तो कसा तें बघा— ]

६ गालिब ! अरे, अमुच्याहि दारीं, आहेच कीर्ती यायची
फक्त आहे देर थोडी, मरणास अमुच्या यायची
येणार ना अमुच्या पुढे ती, प्राण असती तोवरी
कीर्ती प्रिया माझी अरे ! ही भलतीच आहे लाजरी.

[ मरणोत्तरहि जर वरील उपेक्षा कायमच राहिली आणि आमचा नाम निशाणहि जर नष्ट करण्यांत आला तर अशा परिस्थितींत रसिक श्रोत्यांना आम्हीं आमचा आणि आमच्या शायरीचा खालीलप्रमाणें पत्ता देऊन ठेवीत आहोंत.]

७ मत्त गंधाची जिथें रानवेलींची फुलें
हंसतील जेथें जाण माझे प्रेत आहे गाडलें.
मोहुनी येतील जेव्हां भृंग त्या कुसुमावरी
जाणतो मस्तीत तेथें, गातील माझी शायरी.

[ शायरीच्या उपेक्षाविषयक आमच्या शंका खोट्या ठरल्या. या काव्य प्रकाराचे अपेक्षेबाहेर स्वागत झालें. महाराष्ट्र सरकारने या काव्य प्रकाराचा पुरस्कार केला. यवतमाळ येथील साहित्य सभेने केलेल्या सत्कार प्रसंगीं आम्ही त्यांना खालील उत्तर दिलें ]

८ मेल्याविना कीर्ती घराशी येईल नव्हतें वाटलें.
होतील हे सन्मान ऐसे स्वप्नांत नव्हतें वाटलें.
वाहवा या शायरीला नुसतीच ना तुम्ही दिली
दाखिले आहे पुरेशी तुमच्यातही ' जिन्दादिली'

[ काव्यामध्यें जर कांही जोष असला तर त्याचे स्वागत करण्यास श्रोते तयार असतात ह्याची मला जाणीव होती. काव्यांत जर 'जिन्दादिली' असेल तर ती श्रोत्यांतही येते. काव्याच्या या यशाची मीमांसा आम्ही खालील-प्रमाणें करीत आहोंत. ]

९ जिन्दादिली काव्यांत अपुल्या पाह्यची होती मला
शायरी याच्याच साठीं निर्मायची होती मला
तेव्हां कुठें कीर्ती प्रियाही हांसुनी आली पुढें
नुसतीच ना आली, तशी, गालही केला पुढें

[ शायरींतील सौंदर्याबद्दल आणि श्रोत्यांच्या रसिकतेबद्दल आम्हाला खात्री आहे. तरीही कधीं कधीं अत्यंत गंभीर प्रकृतीचे श्रोते भेटतात त्यांना अर्थातच हा काव्य प्रकार उल्हसित करूं शकत नाहीं. अशा श्रोत्यांच्या बाबतींत आम्ही परमेश्वराला ही प्रार्थना करीत आहोंत ]

१० शायरी ऐकून माझी सांगेल जो आतां पुरे.
जो रतीला चुंबिताही सांगेल की आतां पुरे.
तोंडही भगवन् अरे त्याचे मला दावूं नको.
ना जरी मंजूर हे ही माझे तया दावूं नको.

# शृंगार

[ शायराच्या अपेक्षेप्रमाणें श्रोतृवृंद आहे असें गृहीत धरून शृंगारविषयक कांहीं शायरी ऐकवूं ]

[ प्रथम भगवान सूर्यावरचा प्रणयविषयक शेर ऐका ]

१ " दिनकरा येते दया, मजला तुझी आधी मधी
आहेस का रे, पाहिली तूं, रात्र प्रणयाची कधीं.

[ सूर्याला अर्थात ही मस्करी सहन झाली नाहीं. त्यानें यावर काय उत्तर दिलें तें बघा ]

२ आम्हासही या शायराची कींव येऊं लागते
यांच्या म्हणे, प्रणयास यांना रात्र यावी लागते
ना म्हणू की इष्क त्याला आहे जराही समजला
इष्कातही दिवसास जो कीं रात्र नाही समजला.

[ प्रणयामधें लाजेला खूप मोठें स्थान आहे. तिच्या वरील कांहीं शायरी ऐकूंया ]

[ कांहीं कारण नसतांना जर कुणी उगीचच लाजलें तर त्यावेळीं असे कांहीं वाटते काय ? ]

३ लाजायचे नव्हतेस, आम्ही नुसतेच तुजला बघितले
वाटते, की व्यर्थ आम्ही, नुसतेच तुजला बघितले.

[ आम्हीं स्त्रीच्या वदनाला चंद्राची उपमा कां देत नाहीं तें ऐका ]

४ उपमा तुझ्या वदनास त्याची, मीही दिली असती सुखें
थोडें जरी, चंद्रास येतें, लाजतां तुजसारखें.

[ लाजेचें अत्यंत सुंदर आणि सूक्ष्म असें दर्शन या प्रसंगाशिवाय कुठें दिसणार ! ]

५ झाली उगा गंभीर मजशीं बोलायचें नव्हतें तिला
हट्ट तर होता असा, की लाजायचें नव्हतें तिला
लाजली ती आज तैसी केव्हांच नव्हती लाजली
आज ती नुसतेच जेव्हां, लाजावयाला लागली.

[ शृंगारातील शेरो शायरींत कधीं कधीं स्वैरता दिसणें साहजिक आहे. लाजेवरचा हा एक शेर पहा ]

६ लाजायचें जें काय सारे पहिल्याच दिवशी लाजली
वाटेल तें केलें आम्ही, नाहीं पुन्हां ती लाजली.

[ कधीं कधीं अपराधाच्या जाणीवेनेही लाजावें लागतें ]

७ पाहता ओशाळुनी तूं मान खाली घातली
बघवली नाही तुला ही आग तूं जी लावली
पेटती ती आग आम्ही जन्मभर सांभाळतो
प्रीतीच्या पंथात आम्ही अग्निपूजा मानतो.

[ तरुणांच्या दृष्टीला खेचून घेणाऱ्या उरोजांबद्दल कधीं असेंहि वाटतें काय बघा ]

८ राहून पदराआड ज्यांनी, नजरेस माझ्या बांधलें
हें बरें कीं त्यास तूंही, आहेस पक्के बांधलें

हें खरें, आम्हास त्यांची काही दया येऊं नये
वाटतें; त्यांना तरीही ही दशा येऊं नये.

[ अशा तऱ्हेनें उरोजांना बांधून कांही न्याय बुद्धि दाखविणाऱ्या प्रेयसीला असेंही ऐकण्याचा प्रसंग येतो ]

९

बांधुनिया तूं त्यांस अपुली न्याय बुद्धी दाविली
दीनता आम्ही तुला पण केव्हाच नव्हती दाविली
ऐसे नव्हे, आम्हास कोणी न्याय द्यावा लागतो
घेऊं तया पाहून, कांही काळ यावा लागतो.

१०

न्यायदानाची नका, ही ऐट आम्हां दाखवूं
केव्हांतरी नक्कीच त्यांना हात आम्ही दाखवूं
रक्षिण्या सामर्थ्य यांना पदरांत कां, आहे कुठें
कळणारही नाहीं तया, होता कुठें, गेला कुठें.

[ सौंदर्यानें दिपून जाऊन सौंदर्यवतीचें दर्शन घडलेल्या प्रियकराची अवस्था पहा ]

११

पाहिलें लावण्य नुसतें बघवली नाहीं तिला
पाहिली चंद्रप्रभा मी, चंद्र नाही पाहिला
ना कळे, सौंदर्य ऐसे पाहण्या का वांचलो
ना कळे हेही पुन्हां पाहूनहि का वाचलो.

[ गालावर धांवणाऱ्या कुंतलांना पाहून असेंही वाटण्याचा संभव आहे.]

१२

बोललों नाहीं कधीं, ना कधीं बोलेन ही
यातना मी काळजाच्या साहिल्या साहीनही
माझें असो, या कुंतलांची येते दया मज सारखी
यांना तरी लोटूं नको, तूं गालावरूनी सारखी.

[ आणखी एक कल्पना पहा ]

१३

कुंतलांची या तुझ्या ही, पाहून सारी दुर्दशा
वाटले कांहीच नाहीं, माझी स्वतःची दुर्दशा
आम्ही अरे, या दुर्दशेला आज जैसे सोसले
जन्मभर या कुंतलांनी हेंच आहे सोसलें.

[ वेणीचे दोन्ही पेड सोडलेल्या तरुणीस पाहून असेंही कां वाटूं नये ? ]

१४

पेड वेणीचे तुझ्या वक्षावरी तूं सोडले
रक्षिण्या धन यौवनाचे, नाग जैसे सोडले
जाणतो प्राणांहुनीही, या धना सांभाळिसी
नाकळे आम्हांस, तुमची " Dog in the manger policy "

[ स्त्रियांची नाजुकता शायरींत अतिशयोक्तीने वर्णिली जाते. ]

१५

टाकिसी हळुवार अपुली नाजूक इतकी पाऊलें
टपकती हलकेच जैशी पारिजाताचीं फुलें
नाजुकता जाणून आम्ही आधिच होती बिछविली
पायातळी केव्हांच तुझिया विकल हृदयें आपुलीं.

[ याचे पुढील ही कल्पना पाहा ]

१६

इतका तरी हा स्पर्श ह्रदया होईल होतें वाटलें
इतुकें तरी सद्भाग्य उदया येईल होतें वाटलें
नाजूकतेची कल्पनाही आम्हास त्या नव्हती कधी
गेली जरी तुडवून आम्हा कळलेच ना गेली कधीं.

[ आणखी एक कल्पना बघा ]

१७

कल्पना नाजूकतेची, यायची नाहीं कधीं
नजरही आम्ही तिच्यावर, टाकली नाहीं कधीं
धाक त्या नाजूकतेचा, होता असा मी घेतला
वाटलें, सोसेल ना ती भारही नजरेंतला.

[ कृश कटीबद्दल उर्दू शायरींत बरेंच वर्णन आहे. कृशकटीच्या वर्णनांत कटी नसल्यापर्यंतची वर्णनें आपण वाचतो. एखाद्या अंगाच्या अभावामुळें जर नाजुकतेची वृद्धी होत असेल, तर खालील कल्पनाही स्वीकारार्ह कां होऊं नये ! ]

१८

सांगती त्याच्या प्रियेला कमर हीं नव्हती कुठे
आकारही माझ्या प्रियेला कोणता नव्हता कुठे
ऐसे नव्हे, आकार घ्याया कांही कमी होते तिला
भारही साकारतेचा सोसला नाहीं तिला.

[ प्रेयसीच्या फोटोच्या स्वप्नांत घेतलेल्या चुंबनाने तिला त्रास झाल्याचें वर्णन नाजूकतेच्या दर्शनासाठीं केलेले आढळते. खालील रुबाईत ह्या कल्पनेच्याही पुढें थोडी जास्त अशी उडी मारून बघितली आहे ]

१९

नुसती जशी डोक्यांत आली चुंबनाची कल्पना
गोऱ्या तिच्या गालावरी उमटल्या साऱ्या खुणा
पाहून हा परिणाम माझे काळीज जैसे थांबलें
कल्पनेचे खेळ माझे तेथेच नव्हते थांबले.

[ शायरी या काव्य प्रकारांत भावनांची आर्तता, सूक्ष्मता कशी असते ते बघूं या ]

२०

आसू विना इष्कात आम्ही, काय दुसरे मिळविलें ?
दोस्त हो, माझें असो, तेही तुम्ही ना मिळविलें
वेगळें सौंदर्य यांचे, जात यांची वेगळी
आसवे इष्कातली या असतात कांही वेगळी
आतां कुठे दैवांत होतीं आमच्या ही आंसवे
आजवरी यांच्याचसाठीं गाळली मी आंसवे.

[ ही अल्पसंतुष्टता बघा ]

२१

जें मिळालें त्यांतही धन्यता मानू अम्ही
केलास जो इन्कार त्याचे दुःख ना मानू अम्ही
ऐसें नव्हे, कीं अम्हा इन्कार तूं नुसता दिला
नसता दिला कोणीच ऐसा दर्द तूं आम्हा दिला.

[ प्रेयसीच्या मीलनावरील कांहीं ओळी पहा ]

वास्तवाच्या या जगीं ना मीलनाची आसही
सोडुनी तूं स्वप्न माझे, कां इथे आलीस ही
वाटते कीं जीवनी या, कांहीच नाहीं राहिले
स्वप्नांतहि पण आज माझ्या कांहींच नाहीं राहिले.

[ तशीच खालील कल्पना बघा ]

२३

आजवरी नुसतेच होतो स्वप्नांत तुजला भेटलों
हें खरें, की आज ऐसे प्रत्यक्ष आहो भेटलों
हाय, माझ्या दुर्दशेला, अंत नाहीं राहिला
प्रत्यक्षतेचाही आम्हा ना विश्वास आतां राहिला.

[ खालील ओळींत कांहीं निराळी कल्पना दिसेल. प्रियकराच्या स्वप्नांत जाऊनही त्याला भेट न देणाऱ्या प्रेयसीबद्दल प्रियकराला काय वाटतें तें पहा ]

२४

येऊनही तेथें अम्हा, भेटूनी ना गेलीस तूं
ऐकतो स्वप्नांत माझ्या, येऊनी गेलीस तूं
यांतही उपकार आम्हा, कांही कमी ना वाटलें
स्वप्नांतही येशील ऐसे स्वप्नांत नव्हते वाटलें.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

( स्वप्नांतल्या मीलनातही प्रियकर कसा संतुष्ट आहे हें बघा )

२५

ऐसी जरी स्वप्नांत माझ्या, येऊनी गेलीस तूं
मानेन कीं प्रत्यक्ष जैसी भेटूनी गेलीस तूं
कां म्हणूं तें स्वप्न आणि कां म्हणूं ही जागृती
काय मोठे त्यांत, आम्ही त्यालाच मानू जागृती.

[ प्रियेचा ध्यास वर्णन करणाऱ्या खालील दोन रुबाया बघा ]

२६

सांगती कीं झोप त्याची चोरुनि नेली तिनें
आज माझी जागृती ही चोरुनी नेली तिनें
आज ही सौंदर्य सारे भोगतो दोहोंतले
विरहासवे या जागृतीच्या भासही स्वप्नांतले.

२७

जागेपणीही तेच आतां स्वप्न मी बघतों इथें
इतुकेच की स्वप्नातली त्या साकारता नाहीं इथे
हे खरे स्वप्नांत जैशी, तैसी इथें नाहींस तूं
येथें जशीं आहेस तैशी स्वप्नांतहि नाहीस तूं.

( मराठी शायरीतील इष्कविषयक दृष्टि कांही निराळी असावयाला पाहिजे. स्वतःच्या सम्मानाशी विसंगत असा इष्क येथें दिसणार नाहीं )

२८

हंसतील ना कुसुमे जरी ना जरी म्हणतील ये
पाऊल ना टाकू तिथे, बाग ती अमुची नव्हे
भ्रमरापरी सौंदर्य वेडे आहों जरी ऐसे अम्ही
इष्कांतही नाही कुठें भिक्षुकी केली अम्ही.

२९

खेळलों इष्कांत जैसे खेळ कांही खेळलो
लोळलों मस्तीत, नाही पायी कुणाच्या लोळलों
अस्मिता इष्कात साऱ्या केंव्हाच नाही विसरलों
आली तशीही वेळ तेंव्हां इष्क सारा विसरलों.

३०

ना म्हणू इष्कांत कोणी पाऊलही टाकूं नका
फक्त अपुल्या विकलतेला दीनता मानूं नका
सौंदर्य तर या दीनतेचे भोगायचें असतें इथें
ऐसे नव्हे, कीं दैन्य नुसते भोगायचें असतें इथें.

३१

दोस्त हो, हा इष्क कांही ऐसा करावा लागतो
ऐसे नव्हे, नुसताच येथें, जीव द्यावा लागतो
वाटते, नागीण ज्याला खेळण्या साक्षात हवी
त्यानें करावा इष्क येथें छाती हवी, मस्ती हवी.

३२

इष्कांतही मागे कुणाच्या, धांवलो नाही कधी
सोसले सारेच जैसे, कांहीच ना झालें कधी
चाटता येती जरी कुत्र्यापरी आम्हा पदें
मिळती अरे, आम्हासही कॉंग्रेसची मंत्रीपदें.

३३

हे खरे लैलास अमुच्या, आहे प्रभूनें निर्मिलें
लैलातले सौंदर्य सारे, आम्हीच आहे निर्मिलें·
ना कुणी, रडवील आम्हा, ना मेनका ना उर्वशी
आम्ही म्हणूं ती मेनका आम्ही म्हणूं ती उर्वशी.

३४

रडलों अम्ही इष्कांत जेव्हा आम्हा रडावें वाटलें
तेव्हां नव्हे, इष्कास जेव्हां, आम्ही रडावें वाटलें
इष्कातल्या आसूवरी हा अधिकार ज्याला लाभला
नुसताच नाही इष्क त्याला मोक्ष आहे लाभला.

३५

बर्बादिची दीक्षा जशी, इष्कांत आम्ही घेतली
इष्क ही बर्बाद करण्या माघार नाही घेतली
ना रडू नुसतेच, नुसते हाय ना आम्ही करूं
आहों शिवाचे भक्त आम्ही, हेंही करूं, तेंही करूं.

३६

ना म्हणू इष्कातलें या, सौंदर्य त्याला समजलें
झाल्यावरी बरबाद, ज्याला, बरबाद झालों समजलें
मद्यांत ही सांगा नशा, मग काय आहे राहिली
झाल्यावरी बेहोष, जेथें जाणीव कांही राहिली
ऐसें नव्हे, कीं ही नशा कोणासही ना समजते
समजते दुसऱ्यास, ज्याची त्याला कधीं ना समजते.

( इष्काचा काल संपून गेल्यावरही तीच धुंद राहत नाहीं असें नव्हे, ती जास्तीच वाढण्याचा संभव आहे )

३७

आतां कुठे त्या मेनका, मी कोठून आणू उर्वशी
आज तर नाही उशाशी, फाटकी साधी उशी
सांगतो, नाही तरीही, इष्क कांही संपला
संपला जो काय त्याचा, पूर्वार्ध नुसता संपला.

३८

आज त्या साऱ्या स्मृती आहेत माझ्या भोंवती
वाटे जसा मी इंद्र आणि अप्सरा या भोवती
दोस्त हो, इष्कांतही ह्या, काही कुठें नाहीं कमी
होते कमी तेव्हांच, तेव्हा आसवे होती कमी.

३९

त्याला कुठे कां इष्क ऐसे आहे मिळालें नांवही
नांवासही ना हाय जेथे, ना आसवांचे नांव ही
आसूंविना जो इष्क येतो, कोणासही तो भोगतां
भोगतां इन्द्रास येतो, कुत्र्यास येतो भोगता.

( अखेर इष्कांतील विफलतेची जाणीव झाल्याशिवाय रहात नाहीं. याच विफलतेत अध्यात्म प्रवणतेची बीजें आहेत )

४०

सारखा होता पुढें चेहरा हंसरा तिचा
होतो अशा मस्तीत जैसा वेणीतला गजरा तिचा
प्राशुनी बेधुन्द होतो, मदिरा तिच्या अधरातली
नव्हतो जसा दुनियेत होतों कल्पवृक्षाच्या तली
चांदणें नुकतेंच होतें जीवनीं या पसरलें
वाटलें दुर्दैव जैसे साफ मजला विसरलें
अर्थ दुसरा जीवनाचा, कळलाच ना मजला कधी
आज जो कळला तसा ना कळो कोणा कधी.

४१

दोस्तहो इष्कांत साऱ्या हेंच असतें व्हायचें
हेही जरी ना व्हायचे तर काय दुसरें व्हायचें
इष्कातलें भवितव्य आम्हा आधीच होतें समजलें
उतरलो इष्कांत जेव्हा, तेव्हाच होतें समजलें.

४२

नाही तरी इष्कांतुनी या कांही नको होतें मला
आसवे येथील कांही, गाळायची होती मला
यांचे विना ही सांगती जे अध्यात्म कांही समजला
अध्यात्म राहो दूर, त्यांना इष्कहि ना समजला.

४३

नुसताच नाही इष्क सारा, समजला आतां मला
वैय्यर्थ साऱ्या जीवनाचा, समजला आतां मला
ना कुठे गेलों, कुण्या साधूकडे ना पोंचलो
नुसताच केला इष्क आणी या पदाला पोचलो.

४४

जळलों असे इष्कात, जैसे कोळसे झालों अम्ही
सागरी आतां भवाच्या, बुडणारही नाही अम्ही
घ्या जरा ऐकून, असलों ऐसा जरी सामान्य मी
उतरावया भवपार नुसता, इष्कही नाही कमी.

काही झाले तरी इष्कातले सौंदर्य अवीटच आहे. केव्हां तरी आपण होऊनच या विषयाची रजा घेण्यांत शोभा आहे)

४५

कुंतलानो, अंचलांनो, द्या रजा घ्या शुक्रिया
वेगळ्या विश्वांत आतां, आहे निघालों जावया
मानतो आभार तुमचे मानतों उपकार मी
निर्भत्सिण्या तुम्हास, नाहीं साधू कुणी वा संत कमी.

४६

ऐसे नव्हे की आजही कंटाळलों तुम्हास मी
सौंदर्य का विषयांतले या केव्हां कुठें होतें कमी
आज घटिका जीवनाची संपावयाला लागली
शुक्रिया, दारीं कुणाची चाहूल येऊं लागली.

★

# जीवन

[ आयुष्याचा संध्याकाल, हाच जीवनविषयक काव्यनिर्मितिचा खरा काल आहे. एखादी गोष्ट संपण्याच्या बेतात आली, की तिची किंमत कळू लागते. ]

१

मृत्युची छाया जशी, ही स्पष्ट होऊ लागली
तेंव्हा कुठें या जीवनाची, ओढ वाटूं लागली
मध्यान्हिचीही सोय जेंव्हा, एकही ना राहिली
तेंव्हा कुठें चूर्णा विनाही भूक वाढूं लागली.

[ याच कालांत माणसाला वैभवात घालवलेल्या गतकालाची आणि वर्तमानकालाची तुलनेने जाणीव होऊं लागते आणि त्याच्या डोळ्यांत आसवे चमकू लागतात.]

२

भूतकालाची स्मृती, ना जरी होती मला
वर्तमानाची व्यथा ही, ना कधी होती मला
हांसू नका, पाहून माझ्या आसवे नयनांतली
सांगतो, ऐसे रडाया खूप पुण्याई हवी.

[ त्याला त्याचा गत काल आठवतो. ]

३

होती अशी ही वेळ, सारे नम्र होते मजपुढे
झेलण्याला शब्द माझा, होते उभे मागे पुढें
आता कुठें तो काल, त्याची खूणही ना राहिली
आसवे माझीच माझ्या, काबूत नाहीं राहिली.

[ आजपर्यंत तो दिमाखाने जगला होता. लाजणें किंवा ओशाळणें त्याला माहीत नव्हते पण :— ]

४

जीवनांतीं आज माझ्या इतुकेच होतें राहिलें
लाजलो नव्हतों कधीं ते, लाजावयाचें राहिलें
निर्लज्जता माझी मलाही, सोडील नव्हतें वाटलें,
निर्लज्ज पण आहे अशी, कांहीं हिला ना वाटलें !

[वर्तमानकाली विपन्नतेचा प्रतिकार आपण निर्लज्जतेशिवाय करूं शकलो नाही याची त्याला कृतज्ञतापूर्वक जाणीव असते. ]

५

निर्लज्जता थोडी जरी या, जीवनी असती कमी
लावला केव्हाच असता, माझ्या गळ्याला फांस मी
अजवरी मी व्यर्थ तिजला, निर्भत्सले या जीवनी
वाटे, अतां पण जीवनी या, ही खरी संजीवनी.

[ तिच्याच आधारावर आज तो कोणत्याही परिस्थितीला तोंड देऊं शकतो. ]

६

जीवनी या काल हाही पाह्यचा होता मला
रस्त्यांतल्या पत्रावळी ही, संपदा वाटे मला
झालो असा निर्लज्ज, की मी आनंदुनी त्या चाटतो
कुत्रा जसा निःशंक तुमची ताट वाटी चाटतो.

[ अशाही परिस्थितीत त्यास कांहीं वाटेनासे होतें, इतकेंच नव्हे तर त्याला जीवनांत कांही वेगळा अर्थ दिसूं लागतो ]

७

जीवनांतीं खास तैसे, कांहीच नव्हतें राहिलें
होते जरा, अपमान थोडे व्हावयाचे राहिले
ओळखीही दुर्दशेशी, व्हायची होती खरी
आतां कुठें या जीवनाला, पूर्णता आली खरी.

[ वर्तमानकालांत त्याला आप्तइष्ट राहिलेले नसतात. तरीही लोचटासारखे त्यांच्याशी त्याला चिकटून बसावेसें वाटतें. त्याला त्याच्या अवशतेची जाणीव आहे.]

८

माझा तरी कोणा म्हणूं, माझा कुणी ना राहिला
नुसताच आहे शब्द, त्याला अर्थ नाहीं राहिला
आतां कुठे हा अर्थ सारा, समजला शब्दांतला
समजला आहे तरीही, नुसताच पण शब्दातला.

[ त्याला सर्वजण विसरलेले असतात, पण हा कोणाला विसरूं शकत नाहीं. ]

९

सारे मला विसरोत त्याचे वाईट ना वाटे मला
वाटतें वाईट त्यांना विसरता ये ना मला
वाचला वेदांत, आणि क्षणमात्र त्यांना विसरलों
दोस्तहो, दुसऱ्या क्षणी, मी वेदांत सारा विसरलो.

[ आपले कुणीच नाही ही जाणीव त्याला एका महान अध्यात्मिक तत्वाचे दर्शन घडविते. ]

१०

कोणीच ना माझे खरे, सिद्धांत हा खोटा नव्हे
सारेच माझे आप्त हेही खरें, खोटें नव्हे.
कोणीच ना माझे जसे हे समजावयाला लागते
सारेच माझे आप्त हेही, तेव्हा कळाया लागते.

[ कोणीच आपले नसते हे समजून आल्यावरही याला त्याच्या आप्तेष्टां-बद्दल जी ओढ वाटते त्याचा हा धिःकार करूं लागतो. ]

११

नावही माझे जयांनी, केव्हाच होतें टाकले
हाय मी त्यांच्याच साठी प्राण माझे टाकले
दारिद्र्य नुसते वाङ्मयी या आज मज दिसतें इथें
निर्भत्सिण्या अपणा पुरेसा शब्दही नाही इथें.

[ आज असा तो एकटा फेकला गेला आहे. तरीही मी एकटा नाही अशी तो आपली समजूत करून घेतो. ]

## १२

नाही जराही खेद, नाही, कोणी जरी माझ्या सवे
आहेत माझ्या सोबतीला, अनमोल माझी आसवे
प्रारब्धही पण नेहमीचे, आहेच माझ्या सोबती
दोस्त हो, मरणांतही या, काल आहे सोबती.

[ आतांपर्यंत त्याला त्याच्या आसवांची तरी सोबत होती पण आज. ]

## १३

आवेग माझ्या भावनांचे ना कळे गेले कुठें
ना कळे, कीं आज माझी, आसवें गेलीं कुठें
हाय माझ्या जीवनीं या, सारेच कांही संपलें
संपले केव्हाच हांसू आज आसू संपले.

[ ही विफलता फार वेळ टिकली नाहीं. आणि तो धैर्यानें दुर्दैवालाच खुशाल आव्हान देऊं लागला. ]

## १४

फेडून घे अर्मान, दैवा, मागेपुढें पाहूं नको
नाहीं कधी म्हणणार मींही, आतां पुरे, आतां नको
भोगले आहे अम्हीही, भोगावया जें पाहिजे
जीवनी, आता अम्हाही चेंज थोडा पाहिजे.

[ त्यानंतर त्याला बरबादीची नशा चढल्या सारखी झाली आणि या नशेची तहान जास्तच वाढू लागली. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ विभाग ........ नों दि: ........
क्रमांक
नों. दि. ........
वाचनालय शाखा.

१५

हें खरें, कीं जीवनीं या बर्बाद झालों एकदा
वाटतें वाईट झालें, बर्बाद नुसता एकदा
क्रूरता या दुर्दशेची, आज मज कळते खरी
बर्बादिची ही हौस माझ्या, हाय ना झाली पुरी.

१६

[ दुर्दशा म्हणजे आपल्याच दुष्कृत्यांचे फळ आहे, ही त्याला जाणीव आहे. ]

बरबादिचा या आज आम्हा, ना खेदहि ना खंतही
झाले उगा बरबाद येथे, सत्शील तैसे संतही
इतुका तरी संतोष आहे, आज हा अमुच्या मनी
झालो स्वये बरबाद, आम्हा बरबाद ना केले कुणी.

१७

[ दुर्दशा आपण होऊन कोणाकडे जात नसते हे याला माहीत आहे. आपल्या दुर्दशेबद्दल आपणच जबाबदार असतो हे तो नाकबूल करीत नाही.]

जीवनी या फक्त आहे, आम्ही आम्हाला मारले
आम्ही अरे, जाणून, डोळे, दुर्दशेला मारले
दोषही याचा कधी, नाही कुणा मी लावला
लावला जो काय नुसता, हात भाळी लावला.

१८

[ आपण असे करण्यास कांही चुकलो किंवा काय. याचा तो विचार करतो. त्याला असेही वाटते की त्याच्या हातून चूक झाली नाही. ]

दोस्तहो, इतुकाच होता, जीवनी माझा गुन्हा
बरबादिलाही हाय माझ्या हाच पण ठरला गुन्हा
पुसतीं मला, कारे असा या दुर्दशेला भाळला
सांगतो, की कोणताही, मर्द असता भाळला.

१९

[ आज तर त्याला त्याच्या उध्वस्त जीवनाचाही उन्माद चढला आहे. ]

पाहिले ऐश्वर्य तेही, आहे तुम्ही जे पाहिले
पाहिलें जास्तीच आम्ही बरबादीचेही पाहिले
राखेतली या धुंद आहे, फक्त दोघा समजली
समजली आम्हास आणि जी शंकराला समजली "

२०

[ आपल्या विषयोन्मुखतेचा परिपाक म्हणजे इहलोकातली दुर्दशा आणि मरणोत्तर नर्कवास हे समजून आल्यावर तो परमेश्वराशी भांडू लागला आहे, आणि परमेश्वराने केलेला अन्याय तो त्याचे समोर सांगत आहे. ]

" भगवान् अरे, नुसते कुठे, तू काळीज अमुचे निर्मिले
आहे तुझ्या दूनियेत साऱ्या सौंदर्य आम्ही निर्मिले
नातरी सारेच असते, पाषाण हे सारीकडे
श्वापदे असतो अम्ही, असतो जसे मुंग्या किडे
नुसतेच ना सौंदर्य तुमच्या दूनियेत आम्ही ओतले
मानुनी सर्वस्व तिजला, प्राण येथे ओतले
बदला परी याचा प्रभो, काय तू आम्हा दिला
आम्ही दिले सौंदर्य आणि नर्क तू आम्हा दिला

२१

तो पुढे म्हणतो ]

" जाणतो, याला जरी, ओशाळला नसतास तू
लपलासहि नसतास ऐसा निर्गुणाच्या आड तू
केली क्षमा आम्हीच आम्हां ही ही करावी लागते
करण्या क्षमा दुसऱ्यास, भगवन्, माणूस व्हावे लागते "

२२

[ तो दिमाखाने परमेश्वरास हेही सांगतो. ]

" आलो तुझ्या दुनियेत नव्हतो, चोर वा डाकू आम्ही
एकही ना चीज इथली, घेऊनीं गेलों आम्ही
तेही असो, आमुच्या सवे आणीला ज्याला इथें
भगवन् अरे, तो देहही मी, सोडुनी गेलो इथें "

२३

[ पण असे प्रत्येकाशीं भांडून कसे जमणार ? कोणाशीहि न भांडतां, कोणावरहि आरोप न करतां आणि परिस्थितीने चिडून न जातां धैर्यानें शंकरासारखे परिस्थितीचे हलाहल पिऊन टाकण्यातच शोभा आहे. ]

" वार शस्त्रांचे कसेही, येतील सारे सोसता
त्यालाच मानू शूर, ज्याला अपमान आलें सोसता.
मानतो प्रत्यक्ष लक्ष्मी, तेथेंच आहे उतरली.
वैभवाची ऐट ज्याच्या, दैन्यातही ना उतरली. "

२४

[ वार्धक्य आलेले असतें, " मी म्हणेन तें झालेच पाहिजे हा हट्ट सोडून द्यावा लागतो. ]

" बोलल्रो नसतो कधीं " होवो सुखे जे व्हायचे "
मानिले हांसून नसते " ऐसेच असते व्हायचे.
साधूपरी या रागलोभा, नसते अम्हीही सोडलें.
अम्हासही नसते जरी का, यौवनाने सोडीलें. "

२५

[ कल्पनेतले विश्व विसरून वास्तवाच्या जगांत आपली काय किंमत आहे हें ओळखलें पाहिजे. ]

" खूप होता गर्व मजला की नव्हे सामान्य मी
कल्पना विश्वांत होतो, जैसा कुणी सम्राट मी
जुळविले पण हात जेव्हां, वास्तवाशी मी जरा.
कळलें मला माझ्याहुनि कोल्हा बरा कुत्रा बरा

२६

[ या पुढें आम्हाला विषयात सौंदर्य दिसत नाहीं असे नव्हे, पण– ]

" थोडे जरी हांसून कोणी बोलले अमुच्या सवें
येतो भरोनी ऊर आणी येतात नयनीं आसवे
ऐसे नव्हे, सौंदर्य ना मी, हास्यांत आता पाहतो
आरंभ साऱ्या दुर्दशेचा हास्यांत आता पाहतो.

२७

[ कधी असेहि वाटतें, कीं मी तुमच्या समोर माझ्या दुःस्थितीचे वर्णन कां करीत आहे ? मी एवढेच सांगेन कीं हे माझ्याकरितां मुळीच करित नाही. ]

" बाजार माझ्या यातनांचा मांडला जाहीर मी
जोगिया गाउं नये तो गाईला चौघांत मी.
दोस्त हो, सांगू खरं, निर्लज्ज का झालों असा
वाटलें माझे असो, तुम्ही तरी थोडे हंसा. "

[ कोणत्याही परिस्थितीत आपला आत्मविश्वास नष्ट न झाला पाहिजे. भंगलेल्या व छिन्नविछिन्न झालेल्या मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव नष्ट झालेले नसतात. अमुक मूर्ति हंसरी आहे, अमुक समाधिस्थ आहे असे ओळखतां येते. ]

२८

" भंगल्या मूर्ती, तयांचे भाव नाही भंगले
भंगलें मंदीर, त्याचे शिल्प नाही भंगलें
जीवनी बरबादिलाही झेलुनीया येथें अम्हीं
आहो उभे तैसेच जैसी वेरुळची लेणी अम्ही. "

[ हे खरे की आपणच आपल्या अवस्थेला कारणीभूत असतों. आपल्या कृत्याबद्दल थोडा खेदही वाटावयाला हवा. पण ह्या आत्मनिंदेला कांहीं मर्यादा हवी.

२९

" मी तरी ही आत्मनिंदा, का करावी एवढी
निर्भत्सिण्या आम्हास सारी दुनियाच आहे येवढी
जीवनी या पौरुषाची, साथ घ्यायाला हवी
निर्भत्सिण्या नुसतेच अपणा लाज वाटाया हवी. "

३०

[ नाही तरी, दुसऱ्याची येवढी पर्वा कां करायची ? ]
" नाही तरी या दो दिसांचे पाहुणे येथे अम्ही
आज नाही, तर उद्यां, परवा तरी जाऊ अम्ही
जाणतो, येथें पुन्हा परतून नाही यायचे.
द्या शिव्या, कांहीं करा, काय अमुचे व्हायचे. "

## ३१

[ जीवनाच्या संगीतांत कोणताहि राग आळवितां आला पाहिजे. ]

“ अजवरी बेधुंद जैसा मांड आम्ही गाईला.
त्याच त्या तल्लीनतेने जोगियाहि गाईला.
कळते आम्हा इतुकेंच आम्हा बेधुंद आहे गायचे
दोस्त हो, हे दैव जाणे, काय केव्हां गायचे. ”

## ३२

[ गतकालाच्या स्मृतीनेच वर्तमानकाली दुःस्थितीची तीव्रता वाटत असते. आज आम्ही या स्थितीच्या पार गेलो आहोत. पूर्वस्मृतीमध्यें आम्हाला विकल करण्याचे सामर्थ्यहि उरलें नाहीं. ]

“ आजहि सारी स्मृति, येते अशी डोळ्यापुढें
बाहुली निर्जीव जैशी, नाचवी कोणी पुढें.
आपुल्या निस्तेज नयनीं, जेव्हां मला ती पाहते
पाहतो मीही जसे, की प्रेत प्रेता पाहते. ”

## ३३

[ जीवनाच्या प्रयोजनाचा सूक्ष्म विचार करीत असता असें वाटूं लागते की, आसू गाळणें ही जीवनाची शोभा आणि उद्देश आहे. तसेच या जीवनाचा खरा आधारही आसवेच आहेत. आम्हाला याची जाणीव होती. आणि म्हणूनच आजपर्यंत आम्ही याना सांभाळून ठेवले होतें. ]

“ आसवे इतुक्याचसाठी नाही कधी मी गाळली
गाळायची होती अशी की नसतील कोणी गाळली
अजवरी या आसवांना जाणून मी सांभाळले
आज या वृद्धापकाळीं यानी मला सांभाळलें. ”

## ३४

[ अंतकाल समीप आला असता त्या वार्धक्यांत आम्ही आसूं वाहत आहोत असें तुम्हाला वाटलें पण– ]

" समजू नका कीं, आसवे नयनातुनी या वाहतो
अस्तास माझ्या यौवनाच्या अर्घ्य आम्ही वाहतो.
जाणतो, हा सूर्य आता उगवायचा नाहीं पुन्हा
जीवनाची, वेल आता, बहरायची नाही पुन्हा
आता तमाशी गांठ आहे, येथून अमुची व्हायची
आता परीक्षा पौरुषाची येथेच आहे व्हायची
होती अम्हा जाणीव, याला सज्जही आहो अम्ही
राहण्या गाफील कोणी, नेहरू नाही अम्ही
या तमाची ना तमा, आम्ही असे साधे नव्हे.
आहो ऋषीचे पुत्र, कोणी रस्त्यांतले कुत्रे नव्हे. "

## ३५

[ जीवनाचें प्रयोजन आणि शोभा रडण्यांतच आहे. हा सिद्धांत आम्ही भगवान कृष्णाला समजावून सांगत आहोंत. या जन्माशिवाय कुठेंहि रडता येणार नाहीं. जन्मण्या आधीं रडावयाला मिळालें नाही. मेल्यानंतरहि रडायला मिळणार नाहीं. म्हणून याच जन्मी आम्हास रडूं दे. असें आम्ही देवाला म्हणतों. " मा सुचः " चा तुझा सिद्धांत चूक आहे असें आम्ही त्याला सांगत आहोंत. ]

रडताच ना आलें अम्हा जन्मण्या आधी कधी
येईल का रडता पुनः मेल्यावरी आम्हा कधी ?
वाटले, कीं याच साठी, जन्म घ्यावा एकदा.
वाटले फेडून घ्यावी, हौस तीही एकदां

आरंभ ही मी जीवनाचा, रडण्यातुनी केला सुरू
अंतावरी राहिल वाटे, कार्य हे माझे सुरू
आता जसा निःशंक रडण्या सरसावलो थोडा पुढें
आलें स्वये भगवान, आणी टाकली गीता पुढे
याही जरी जन्मांत आम्हा देईल ना कोणी रडू
मी तरी सांगा अता, कोठे रडूं, केऱ्हा रडूं ?
बोललो रडलास तूही हरवता सीता तुझी
रडता अम्ही आम्हा पुढे टाकसी गीता तुझी
ओशाळला ऐकून झाली सारी स्मृति त्याला पुनः
भगवान ही मी काय सांगू, माझ्या पुढे रडला पुनः
आसवे त्याचीच पुसली, नयनातूनी आम्ही स्वये
प्रार्थुनी म्हणतो कसा " सांगू नको कोणास हे "
बोललो कीं " व्यर्थ आहे, सारी अशी शंका तुझी "
राखायची आहे मलाही, परमेश्वरा अब्रू तुझी
रडण्यातहि सौंदर्य माझ्या, ना जरी बघते कुणीं
भगवन अरे, ही शायरीही ऐकिली नसती कुणी
तूच ना रडलास देवा, रडले मुनी रडले ऋषी
' तस्मादपरिहार्येर्थे न त्वं शोचितुमर्हसी "
जाणतो देवा अम्हीही रडण्यास या भ्यालास ते
' क्लैब्यं मा स्म गमःकृष्ण । नैतत् त्वै उपपद्यते ।'
चारुता हास्यांत तैसी रडण्यातही आहेच ती
मानतो इतुक्याच साठी, धीरस्तत्र न मुह्यति ।
सिद्धांत ऐसा आसवांचा त्यालाच मी सांगीतला
होता जसा युद्धांत त्याने कुंती सुता सांगितला
बोलला, " साक्षात् अविद्यानाथ आम्ही पाहिला.
पार्थाहुनीही मूर्ख आम्ही अद्याप नव्हता पाहिला "

३६

[ या जीवनाचा विचार केल्यावर आम्हाला स्वर्गाचीही महती वाटत नाही. ]

" स्वर्गातहि जाऊन आता काय मज मिळवायचे
मिळविले सारेच येथे, स्वर्गात जे मिळवायचें
इंद्रा, अरे सांगू नको, त्या मेनका अन् अुर्वशा
कोणा हव्या विसळून तुमच्या या चहाच्या कपबशा
कल्पवृक्षाची तुझ्या त्या, ना अम्हा मातब्बरी
अमुच्या अरे, ह्या कुंपणाची त्याहुनी मेंदी बरी.
त्यांनाच ने स्वर्गात, ज्यांनी त्रास येथे भोगला
राहून नुसत्या संयमानें, वनवास येथे भोगला
मिळविण्या स्वर्गास ज्यानी नर्क येथे भोगला
आम्हा कशाला स्वर्ग, आम्हा काहीच ना येथे कमी
आहे जरा जास्तीच येथे स्वर्गात जे आहे कमी
आसवे आहेत येथे, दर्दहि आहे इथें
जीवनाचा प्राण माझ्या, विफलता आहे इथे
हें हवे आम्हास, आम्ही स्वर्ग याला मानतो.
साफल्य साऱ्या जीवनाचे आसूंत आम्ही मानतों "

३७

[ आसवाविषयीं जितका विचार करावा तितके त्यांचे उपकारच वाटूं लागतात. ]

" आसवे ही आज अंती नसती जरी का शेवटी
विझविण्या शोकानलाला कोण होते शेवटी
येउनी नयनात जैसे, गालावरी ते उतरले
करुणाघनाचे दूत जैसे सांत्वनाला उतरले
वाटलें कोण्या मुनीची, साथ जैसी भेटली

वाटलें, कीं माय जैसी लेंकराला भेटली
जीवनाचे सत्य सारे, बघण्यास जर कोणा हवे
दोस्त हो, ते पाहण्याला डोळे नको, आसू हवे
आधार माझ्या आसवांचा नसतों जरी आम्हा इथे
सांगतो नक्कीच असतो दीना परी रडलो इथे ”

३८

[ आसवे ही जन्मभर साथ देतील असे नव्हे ]
“ खूप माझ्या आसवांनी साथ मज होती दिली.
ऐसी दिली होती जशी. कोणी कुणाला ना दिली.
हाय तेही आज मजला, सोडून गेले एकटे
वाटलें नव्हते कधी, पण आज वाटे एकटे. ”

३९

[ जीवनाचा संपूर्ण विचार केल्यावर इथे खरोखरच काय आहे, काय असावयाला पाहिजे यासंबधी काहींच कळत नाही. मन बावरून जाते. जीवनाचा अर्थ कळेनासा होतो. याचे उत्तर शोधून काढीत असतां डोळ्यातून आसू वाहूं लागतात. उत्तराने मिळणाऱ्या समाधानापेक्षां या आसूमुळें चित्तवृत्ती स्थिर होऊं लागते. ]

तैसाच झालो शांत मी ही या आसवांच्या अर्णवी
शेषावरी श्रीकृष्ण जैसा, झोपला क्षीरार्णवी
काय माझ्या आसवांनी, आज मज नाहीं दिलें
तें दिलें, जें ईश्वराने, योग्यासही नाहीं दिलें

४०

[ या योगमायेतून जागे झाले की फिरून जीवनाच्या अर्थासंबंधी विचार सुरू होतात. ]

" अर्थ साऱ्या जीवनाचा, हाच आहे समजला
समजलो ना मी कुणा, कोणी न मजला समजला
तेहि असो, पण गर्व ज्याचा जीवनीं मी वाहिला.
आज मज, त्याही यशाचा, अर्थ नाही समजला.
झालों जरा बेचैन आली डोळ्यांत माझ्या आंसवे
आसवांचा ही मला ना, अर्थ काही समजला.
अर्थ जेव्हा जीवनाचा, सुज्ञास मी पुसला स्वये
काय सांगू त्यास माझा, प्रश्न ही ना समजला.

४१

[ जीवनाचा अर्थ शेवटी चंद्राकडे पाहूनच कळतो. अंतरीचें आपलें दुःख विसरून जगाला हासवत रहाणे, याशिवाय जीवनाला अर्थ नाहीं. ]

उजळतां साऱ्या जगा चंद्रा ! जरी आले तुला
उजळतां आलाच नाहीं, अंतरीचा तम तुला
अर्थ हाही जीवनाचा, चंद्रांत ज्यानें पाहिला.
मानू आम्ही त्यानेच आहे चंद्र कांहीं पाहिला.

★

## विनोद आणि संकीर्ण

१

[ जीवनासारख्या गंभीर विषयाचा विचार आम्हास जास्तीच गंभीर करीत जाईल. नाहीं तरी या साऱ्या उपदेशाने आम्ही विटलो आहोत.]

जातो तिथें उपदेश आम्हा सांगतो कोणीतरी
कीर्तनें सारीकडे, सारीकडे ज्ञानेश्वरी
काळजी अमुच्या हिताची येवढी वाहूं नका
जाऊं सुखे नरकांत, आम्ही, तेथे तरी येउं नका,

२

असें नव्हे कीं कांही सन्मार्ग धरूं नये असे आम्हाला वाटते. पण आज इतक्या उशीरा सन्मार्गावर येऊनहि काय उपयोग ! जीवनाच्या परीक्षेंत नापास होणार हें दिसतेच आहे. ]

वाटे धरूं, सन्मार्ग, आता काळ थोडा राहिला
वाटे कशाला व्यर्थ, आता काळ थोडा राहिला
आहे जरी नक्कीच ठरलें, व्हायचें नापास मी
मिळवूनीयाही, काय आतां हस्ताक्षराचे मार्क मी

३

[ आमच्या दीर्घायुष्याचे गूढ सांगतो. ]

शब्दही या पौरुषाचा, बोललो नाहीं कधी
जगलो असे गुपचाप, जैसे जन्मलो नव्हतो कधी
दीर्घायुषाचे मर्म माझ्या, समजणे सोपें नव्हे
मृत्यूसही वाटेल याला हातही लावूं नये

४

[ आमच्या या अशा जगण्याची परमेश्वराने दखल घ्यावयास हवी– आम्ही त्याला म्हणतो. )

निर्दाळण्या दुष्टास, तुजला त्रास घ्यावा लागला
देह घ्यावा लागला, अवतार घ्यावा लागला
त्याहूनही दुर्वृत्त आम्ही त्रासवीले ना तुला
मेलो असे गुपचाप की, हे माहीतही नाही तुला

५

[ आमच्या दीर्घायुष्यामुळें आमचा शास्त्रपुराणांवर विश्वास बसत चालला. पुण्यात्मे अल्पायुषी असतात असें शास्त्र सांगते. ]

मानतो शास्त्रें पुराणें, भोळा नका समजूं मला
श्रद्धा नव्हे नुसतीच येथे, आहे पुरावा चांगला
सांगती सत्‌शील मरती, अल्पायुषी ते बापडे
शास्त्र सत्याचा पुरावा, हा मी उभा तुमच्या पुढे

६

[ पौरूषाने एखाद्या ध्येयाकरीतां लोक कां जगतात हें आम्हाला कळत नाही. तसेच कांहींही न करता आमचे तर कांहीच कमी झालें नाही. ]

काहीच ना झाले कमी, मी कांहीच ना केलें तरी
घरच्याघरी वार्धक्य आलें मरणही घरच्या घरीं
खूप झाले श्राद्ध, होतो त्या तिथें अदृश्य मी.
आनंदलो पाहून सारे, कांहीच ना झाले कमी.

७

[ आयुष्यांत आम्ही चुका केल्या त्या आम्हाला कळल्याही ]
ऐसे नव्हे, की बेवकूफी, माझी मला ना समजली
समजली प्रत्येक वेळीं, थोडी उशीरा समजली
दोस्तहो, मी बेवकूफी, फक्त, त्याची मानतो
बेवकूफीला अरे जो बेवकूफी मानतो

८

[ यानंतर चंद्रावरची कांही शेरोशायरी बघा. ]
चंद्रासवें राहून आम्ही, मसणातही आलो तरी
यांचे म्हणे, रॉकेट ही ना पोचले चंद्रावरी

९

अद्यापही मी नीलव्योमीं, चंद्र नाही पाहिला
समजू नका सांगेन, तुम्हा, कोठे कसा मी पाहिला
ऐसे नव्हे, तुम्हास कांही सांगू नयेसे वाटते
तुमच्या अरे, संभाविताची शंका मनाला वाटते.

१०

जेव्हा तिचा मुखचंद्र आम्ही जवळून अगदीं पाहिला
दुर्बिणी घेउन वाटे, चंद्र जैसा पाहिला
चंद्रा परी ते डाग जेव्हां, गालावरी दिसले मला
सादृश्यही उपमेतले त्या, तेव्हां कुठे पटलें मला

११

समजू नका, कीं चंद्र नुसता, विहरतो तारांगणीं
आम्हासही, पण चंद्र ऐसे, संबोधिले होते कुणी
ऐसे नव्हे, की आज सारी, संपली संबोधनें
आजही आहेत कांही, वेगळी संबोधनें

१२

[ प्रेयसीची ही विरहावस्था बघा--- ]

वाटले विरहांत माझ्या, आसवें गाळील ती
वाटले, चिठ्ठी तरी, कांही मला धाडील ती
कांहीच ना झालें तसें, ती विसरली होती मला
हासुनी म्हणते कशी, " कांही कमी नव्हतें मला "

१३

[ आमच्या प्रणयांतील ही पत्रव्यवहाराची कथा ऐका ]

पत्रें तिला प्रणयांत आम्ही खूप, होती धाडिली
वाटते, होते बरे, नसती जरी कां धाडिली
धाडिली मजला तिनेही, काय मी सांगू तिचे
सर्व ती माझीच होती, एकही नव्हतें तिचें

१४

पत्रांत त्या जेव्हां तिचेही, पत्र हाती लागले
वाटले जैसे कुणाचे, गाल हाती लागले
पत्रांतही पण हाय तेथे, काय ती लिहिते बघा,
माकडा आरशांत अपुला, चेहरा थोडा बघा

१५

[ आज इतके वर्षांनंतर आम्ही तें पत्र फिरून एकदा वाचतो ]

दोस्त हो, ते पत्र आम्ही, आजही सांभाळतो,
रुक्मिणीचे पत्र जैसा, श्रीहरी सांभाळतो,
येतो भरूनी ऊर, आणि कंठ आतां दाटतो
एकही ना शब्द तिथला, आज खोटा वाटतो

१६

सार्थता संबोधनाची, आज ती कळली मला
वैय्यर्थता या यौवनाची, तीही अता कळली मला
नाही तरीही धीर आम्ही, सोडला कांहीं कुठे
ऐसे नव्हे, कीं, माकडाला, माकडी नसते कुठे

१७

[ हाही प्रसंग ऐका ]

एकदां म्हणते कशी, " ना कधीं बोलेन मी "
"ठीक" मी म्हणताच बोले, "कां बरे ! बोलेन मी
मी म्हणालो "हे पहा, तूं बोल वा बोलूं नको
तूं हवी आम्हास बाकी, आम्हा तुझे कांहीं नको"

१८

ऐकुनी म्हणते कशीं, " नुसता पशू आहेस तूं
वाटलें नव्हते कधी, हा असा आहेस तूं"
मान्यता नुसतीच ना, शब्दा तिच्या आम्ही दिली
काय नुसत्या मान्यतेला, सार्थता, आम्ही दिली

१९

[ यानंतर काही मजनूवरील शायरी बघू ]

मजनु अरे, ऐसे नव्हे की तूच लैला पाहिली
पाहिली आहे आम्हीही, नुसतीच नाही पाहिली
आम्हासही तुझिया परी, आहे रडावे लागले
इतुकेच, की आधी नव्हे, आतां रडावे लागले.

२०

मजनू अरे, ऐसे नव्हे, की तूंच लैला पाहिली
एकदा तिजला आम्हीही, जन्मांत होती पाहिली
समजूं नको, की तूच होता, मजनू जगी या एकटा
दोस्ता, अरे लैलास माझ्या, मीच नव्हतो एकटा

२१

मजनू अरे, भलताच कांही, पंथ तूं हा काढला
दोस्ता असा तूं जन्म सारा, रडण्यांत नुसता काढला
सौंदर्य तर आम्हासही, कळते जरा रडण्यातले
रडण्यातले तुझिया नव्हे, लैंलाचिया रडण्यातले

२२

मजनू अरे, थोडा आम्हा कां, भेटला असतास तूं
एकही आसू खरोखर, गाळला नसतास तूं
एक नाही लाख लैला, मिळविल्या असल्या अम्ही
मिळविल्या नुसत्याच नसत्या, वाटल्या असत्या आम्ही

२३

आम्हासही लैला कुणी, कोठें अशी असती जरी
दाविले असते आम्हीही, काय असते शायरी
दैन्य पण अमुचे असे, की मीच सारे व्हायचे
मीच मजनू व्हायचे, अन् मीच लैला व्हायचे

★

# ईश्वरावरील कांही शायरी

२४

आम्हा हवा अन्याय, भगवन् वाटेल ते वाटो तुला
वाटते, की न्याय बुध्दी, केव्हाच ना होवो तुला
अन्याय जर देवा असा, नसता कधीं तुमच्या इथे
असतो अम्ही नरकांत, नसतो केव्हाच हे ऐसे इथे

२५

भगवन् अरे, ऐसे नव्हे, अवमानिले आम्ही तुला
सांगूनियाही काय वाटे, कळणार ही नाही तुला
पापात्मता पाहून माझी, होतो असा मी लाजलो
नावही घ्याया तुझे, मी इतुक्याचसाठी लाजलो

२६

देवा अहो, सामर्थ्य माझे, समजू नका कांहीं कमी
तुमच्या दयेच्या सागराला, केव्हांच केला शुष्क मी
जाउं द्या गेलो तरी, नरकांत आता एकदा
उतरायचा होता मलाही, गर्व तुमचा एकदा

२७

भगवन्, तुला जर " हाय " ऐसे, नांव असते लाभले
आम्हासही कोटी जपाचे, पुण्य असते लाभले
पाहून हे सत्कृत्य तुजला, संतोष असता लाभला
आम्हासही रडण्यात नुसता, मोक्ष असता लाभला

२८

देवा अरे माझ्यावरी अगदीं दया दावू नको
सूटही शिक्षेतली, या .काही मला देऊं नको.
सांगतो; थोडा जरी का, आज झालो मुक्त मी
ऐसे नव्हे, की तेच सारे, नाहीं पुनः करणार मी

२९

[ आम्ही स्वर्गात काय पाहिले ते पहा ]
गेलो जरा स्वर्गांत बघण्या, काय आहे ते खरे
ऐकिल जे काय आम्ही, सारेच नव्हते ते खरे
ऐसे नव्हे, की अप्सरा, स्वर्गांत नसते एकही
इंद्रा घरी असतात साऱ्या, बाहेर नसते एकही



७८८५३

३०

सांगू पुढे स्वर्गांत आम्ही काय जास्ती पाहिले
कल्पवृक्षांच्या तळीही दीन दुबळे पाहिले
झाला जरासा भास वाटे, पाहून मजला हासले
नुसताच होता भास, नव्हते जन्मांतहि ते हासले
पाहोनिया वृक्षास सारे, होते असे संतापले
त्यांनी अरे वृक्षास अपुल्या, नुसत्या नखांनी कापले
वाहनाशी, साधनाशी, वैर त्यांचे एवढे
पृथ्वीहुनी स्वर्गास सारे, पायीच आले एवढे
बोलले जे काय त्याचा, कळला मला ना अर्थही
समजला त्यांनाच नव्हता, स्वार्थही परमार्थही
होते जरासे अंग त्यांनी, वस्त्रांत अपुल्या झाकले
इतुकेच जे झाकावयाचे, तेच नव्हते झाकले
स्वर्गही वैराण करण्या, एकत्र ते होते तिथे
दोस्त हो, इथलेच सारे, सर्वोदयी होते तिथे

३१

[ क्यू मध्ये उभे राहिल्यावर कधी असाही अनुभव येतो ]

लागला धक्का तिचा, जोरात पण होता मऊ
ती म्हणे " सॉरी " मला, पण मी म्हणालो " थँक यू "

३२

[ सुंदर तरूणीकडे सारखे बघू नये याची आम्हांसहि जाणीव आहे. पण नजर खेचली जाते याला कांही उपाय आहे काय ? ]

पाहू नये तुमच्याकडे आम्हासही पण वाटते
पाहिले नाही तरीही, चूक केली वाटते
दोहोंतुनी इतुकेच आम्ही शोधून आता पाहिले
पाहतो आता जसे, कीं पाहिले ना पाहिले

३३

[ आम्ही सरळ सांगणारे लोक आहोंत. ]

येऊं नका अमुच्याकडे, अमुच्याकडे पाहूं नका
इतुक्यावरीही याल तेव्हां, मागे पुढें पाहूं नका
कांहीं म्हणा आम्हास, आम्ही, सांगतो गोष्टी खऱ्या
हे पहा घरच्या घरी आम्ही बरे तुम्ही बऱ्या,

३४

[ आम्ही साऱ्या जन्मांत फक्त एकदांच आमचे वचन पाळले नाही— खरे पाहिले असता हा वचनभंग होता काय ? ]

जन्मांत मी इतुकेच होते पाप माथी घेतले
मागीतला मी एक, आणी लाख होते घेतले
वाटते मी व्यर्थ ऐसा, दोष लावुन घेतला
वाटते अद्याप जैसा, एकही ना घेतला—

३५

[ आम्ही तिला पाहिले होते. पण कुठे ? ]

ऐसे नव्हे की मी तिला केव्हांच नाहीं पाहिली
पाहिली होती तशी, नाहीं तशी मी पाहिली.
पाहिली होती तशी ही तश्शीच अगदी पाहिली
पाहिली स्वप्नात तिजला अन्यत्र नाहीं पाहिली.

३६

[ नायलॉनचे आम्ही उपकारच मानतो ]

निर्मिती नायलॉनची या ना जरी होती कधी..
सांगतो, आम्हा अभाग्या, काहीच ना दिसते कधी
पाहिल्या आहेत पूर्वी आज ही पण पाहिल्या
आम्ही अशा जन्मांत नुसत्या साड्याच असल्या पाहिल्या

३७

मौज या नॉयलॉनची, जेव्हा अशी मी पाहिली
वाटले, नक्कीच काही, और दुनिया पाहिली
वाटते हे ही पुनः नव्हते आम्ही हे पाह्यचे
पाहुनी या काय, वाटे खूप आहे पाह्यचे.

३८

[ कांहीं म्हणा पण एकदां हे असे झाले खरें ]
काहीच ना केले तरी ही, होती जरा नाराज ती
वाटले, की याचसाठीं, होती जरा नाराज ती
मी म्हणालो, "बात कांहीं समजण्या आम्हा हवी'
ती म्हणे, "पुसण्यास नुसते, लाज वाटाया हवी"
....संतापलो ऐकून बाकी, कांही मला ना समजले
झालें पुढें जे काय आम्हा दोघासही ना समजले

३९

[ जेथे तेथे मोठमोठी धरणे बांधण्यांत येवढा पैसा कशाला खर्च करतां ?]
भिजविण्या भूभाग धरणें, बांधू नका सारीकडे
फक्त पुतळे पूर्वजांचे उभवून द्या सारीकडे
दृश्य तुमच्या पौरुषाचे बघतील ते जेव्हां पुरे
भिजविण्या भूभाग नुसते त्यांचे अरे रडणे पुरे

४०

आतां कशाची लाज आता काश्मीरही देऊ अम्ही
काय त्यानें भारताचे, व्हायचे आहे कमी
दिल्ली जरी गेली तरी ही हार ना आम्ही म्हणू
बंधुता दावू जगा "जय जगत्" आम्ही म्हणू

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
क्रमांक
अनुक्रम
विभाग
वि:
क्रमांक
नों. दि.
नों. दि.
शाखा

४१

[ आम्हांला शहीदांच्या बद्दल आदर आहे : ]

मारतो आम्ही मुले, वृद्ध बाया अर्भके
पाहुनी निःशस्त्र जनता, नेम ना अमुचा चुके
स्मारके त्यांची कराया, सज्जही आहो आम्ही.
भ्याड ना नुसतेच तैसे, निर्लज्जही आहो आम्ही

४२

[ आम्हांला शत्रूत शत्रूत्व दिसले नाहीं, म्हणून काय झाले ? कुठेच दिसले नाहीं असें नव्हे. ]

सांगती शत्रूस आम्ही शत्रूच नाहीं समजलो.
सांगू तरी मी काय यांना, काय आम्ही समजलो.
ऐसे नव्हे, शत्रूत्व यांना, कोठेच नाहीं समजले
समजले जे काय सारे स्वजनांत अपुल्या समजले.

४३

[ आमची परिस्थिती फार चमत्कारिक झाली आहे. राष्ट्रातील चैतन्याकरितां अस्मिता असावी लागते हे खरे पण आम्ही ती कशाची मानणार ?]

बोलू नका कैलास आम्हा धार्मीकता कोठे नको
गाऊ नका शिवभूप आम्हां जातीयता कोठे नको
आहे निधर्मी राज्य येथे अस्मिता नुसती हवी—
केव्हांच ना सांगू आम्ही, का हवी कसची हवी.

४४

[ युद्ध टाळण्याचे आमच्या सारखे तंत्र कोणास माहिती नाही ]

उचलतो ना शस्त्र आम्ही, फक्त जोडे उचलतो
मारतो ना बॉम्ब, आम्ही फक्त डोळे मारतो.
युद्ध तर अमुच्या सवे होऊच ना देवू कधी
सांगा कसे लढतील जर कां, लढलोंच ना आम्ही कधी

४५

[ आमची कितीहि बेइज्जत होवो आमची शांति भंगणार नाहीं, परकियांनी केलेल्या अत्याचाराकडे थोड्या निराळ्या दृष्टीने बघितले पाहिजे. ]

नेत्रो स्त्रिया ओढून, त्यांना केंव्हांच ना शत्रू म्हणूं
काय मोठे त्यांत, आम्ही मेव्हणे त्यांना म्हणू
सांगतो निक्षून अम्हां, शांती हवी, शांती हवीं,
सांगतो ती ही पुनः अमुची नको त्यांची हवी.

४६

[ असे काही केल्याशिवाय युद्ध टळणार नाही. आपण स्वस्थ बसल्यास आक्रमक संतुष्ट होतच असतो. ]

आज नाही तर उद्या परवा तरीं केंव्हांतरी
होतील ते संतुष्ट, अमुचे, इतुके जरा ऐका तरी
युद्धातले हे तंत्र जैसे, आम्हास आहे समजले
अद्यापहि दुनियेत साऱ्या कोणास नाही समजले

४७

[ आमच्याशी खरोखरच कोणी लढण्याची काय आवश्यकता आहे. ]

व्यर्थ का श्रमतोस चायना, युद्ध हे आता पुरे
करण्या अम्हा बरबाद अमुची नुसती अरे कॉंग्रेस पुरे
समजा जरी का वाटली तौहीं तुला काही कमी
चायना, अरे देशांत अमुच्या सर्वोदयी नाही कमी

४८

[ कॉंग्रेस मध्यें शिरलेली अव्यवहारता आणि दुबळी व खुळचट अध्यात्मता जर नष्ट होईल तर आजही आम्हाला काय कमी आहे ? ]

दोस्त हो पक्षांधतेने बोललो ऐसे नव्हे
ऐसे नव्हे कॉंग्रेस जैशी, आमुची कोणी नव्हे
नसली जरी ती आज आमुची, केव्हातरी होंतीच ती
विसरलो नाही तिला ना विसरली आम्हास ती.
थकलो हिला सांगून, आहे वेडी हिची अध्यात्मता
अध्यात्मतेवाचून आम्हा शत्रूच नाही कोणता
इतुकें जरी वैगुण्य अपुलें दैवे हिला कळले पुरे
शत्रूसवे लढण्यास अमुचे प्रेत ही नुसते पुरे

४९

[ भारताची भूमि ही वीरप्रसू भूमि आहे ]

ऐसे नव्हे, की भारती या बुद्ध नुसता जन्मला
नुसताच नाही बुद्ध येथे आहे शिवाजी जन्मला
वीरतेची भारती या ना कमी झाली तरी
इतिहास अमुच्या पौरूषाचा इतिहास ना झाला कधी

५०

[ चीनचा उद्देश भारतावर आक्रमण करावयाचा आहे असे नव्हे. ]

जन्म यावा भारती या वाटते सर्वांस ही
वाटते सर्वांस तैंसे, वाटते चायनासहि
इतुकें खरें कीं, जन्म त्यांना आला जरी नाही इथें
वाटतें नक्कीच त्यांना, मृत्यू तरी यावा इथे

★

## : मृत्यू :

[ मृत्यूला आम्ही आजच बघत आहोत असे नव्हे. ]

१

ऐसे नव्हे मृत्यूस आम्ही केव्हांच नाहीं पाहिले
खूप आहे पाहिले त्या, प्रत्येक जन्मीं पाहिले
मारिले आहे आम्हीही, मृत्यूस या प्रत्येकदा
नुसतेच ना मेलो आम्ही, जन्मलो प्रत्येकदा

२

[ मृत्यूच नसता तर किती भयंकर प्रसंग आला असतां ]

अपुल्या मागे असा हा, मृत्यू जरी ना लागता
आपणा आपुल्याच हाती, फास घ्यावा लागता.
झालों आतां निःशक, आता, ना कधी कोणा डरु
आहे आम्हा विश्वास, आम्ही केव्हां तरी नक्की मरुं

३

[ आम्ही जन्मभर आमच्या शेजाऱ्यांशीं कधी शब्दही बोललो नाहीं. आम्हीं मेल्यावर त्यांना जो त्रास झाला त्याच्या आठवणीने आमचे हृदय भरून येते.

ओळखी नव्हती तरीही, भेटावया आलें मला
तिरडीवरीं बांधून, आपुल्या खाद्यावरी नेले मला
ना कळे, की, पूर्व जन्मी, काय मी त्यांना दिले
इतुके खरे. मी आज त्यांना "थँक्स" ही नाहीं दिले.

४

[ मृत्यूचे भय पार उडून जाण्यांकरितां असेही व्हावे लागते. ]

ना जरी संसार सारा, रुक्ष हा होता असा
जिंकता आताच नसता, आम्हांसही मृत्यू असा
वेगळा उत्साह कांहीं,, आज वाटू लागला
आज तर प्रत्यक्ष मृत्यू आप्त वाटूं लागला.

५

[ आमची अशी समजूत होती की आम्ही मेल्यावर कोणाला वाईट वाटेल पण- ]

कफन माझे दूर करूनी, पाहिले मी बाजूला
एकही आसू कुणाच्या, डोळ्यात नाहीं पाहिला
बघुनी हे, माझेच आसूं धांवले गालावरी
जन्मभर हांसूनही मी, रडलो असा मेल्यावरी

६

[ आमच्याकरितां कोणीच रडले नाहीं हे बघून आम्हाला राग का येणार नाहीं ? आपल्यांतल्या एका समाजाची आम्हांला आठवण झाली. त्या प्रांतांतील समाजांत मृतांच्या करितां रडण्याची एक प्रथाच पडून गेली आहे ]

सूडही याचा तसा, नाहीं कधी मी घेतला
जन्म ही पुढचाच माझा, अजमीरला मी घेतला
एकहीं रडल्याविना, ना राहिला तेथें कुणी
इतुकेच, की तेथें तसा, फुकटांत ना रडला कुणी.

७

[ आतां या वृद्धापकाळी आम्ही रडण्याला सुरुवात केली आहे. आम्हांला आतां मृत्यूचीच काळजी उत्पन्न झाली आहे. त्याच्याच हिता· करितां त्याने आम्ही रडण्यास प्रारंभ करण्याच्या पूर्वीच यावे अशी आम्ही त्यास विनंती करीत आहोंत. ]

मृत्यो ! अरे, आधीच जरना न्यायया येशील तूं
आसवांच्या सागरीं या, कोठे तरी बुडशील तूं
वाटते चिंता तुझी काय मी सांगूं तुला
मृत्यो ! अरे, मृत्यू असाहीं केव्हांच ना येतो तुला

८

[ माझ्या घरीं माझा एक तरूणपणाचा मोठा फोटो होता. मी मेल्या- नंतर फोटोच्या रूपानें जिवंत राहिन असे मला वाटले. म्हणून एकदां मेल्या· नंतर मी लिंग देहाने घरीं येऊन पाहिले. ]

मेल्यावरी ही एकदा, मी परतुनी आलो घरी
तेच होते दार आणि तीच होती ओसरी
होती तिथे तसबीर माझी, भिंतीवरी त्या टांगली
खूप होती धूळ, आणि कसर होती लागली
द्रवलो तिला पाहून, होती शेवटी माझीच ती
दिसली, मला पण आज, माझ्या प्रेताहुनी निस्तेज ती
[ या नंतर तसबीर माझ्याशी बोलू लागते, ]
बोलली, की का बरे, नेलेस ना मजला सवे
आहे इथें कां, सांग कोणी, पुसण्यास माझी आसवे
हीच का, होतीं अशी, माझ्या वरीं माया तुझी
टाकुनी गेलास तिजला प्रत्यक्ष जीं छाया तुझीं
बोलली, हेही तुला कां सांगावयाला लागले
मेल्यावरी, जगण्यास वेड्या, खूप कीर्ती लागते
कीटापरी स्वार्थांध, नुसता कैसा तरी जगलास तूं
आहेस कां, केला कुठे, जगण्या विना पुरुषार्थ तू
जीवनीही, ज्यास कोणी संम्मानिले नाही कधी
तसबीरी, त्याच्या कुठे कां, संभाळतो कोणी कधी ?
समजली, आतां तरी ना, आपुली स्वतःची पायरी
समजले ना, काय मिळते, नुसती करोनी शायरी
ओशाळतो ऐकून, नेली, तसबीर मी ती उचलूनी
सांगतो, याची तिथें चर्चाहि ना केलीं कुणी

९

[ मेल्यावर आम्ही कसे दिसतो. हे पहाण्याकरितां आम्हांला प्रत्यक्ष मरावं लागेल असे नाहीं, आज या वृद्धापकाळांत नुसता आरसा बघितला तरी पुरेः ]

आरशांतुन एकटक मज कुणी पाहात होते.
नयनीच होता जीव, बाकी सर्व कांहीं प्रेत होते
सांगू नका, संतादिकानी, मरण त्यांचे पाहिले
दर्पणी, आहे आम्हीही प्रेत अमुचे पाहिले.

१०

[ आमच्या फोटोची दुर्दशा कशीही होवो, फोटोच्या रूपाने जगास फसविण्याची धडपड आमची सुरुच असते आमचे फोटोही आमची वास्तवता दाखवणारे नसतात. ]

: ना कळे तेव्हां कुठें आणि कसा राहीन मी
फोटोतूनी, नुसताच जेव्हां, तुमच्या कडे पाहीन मी
फसविण्या नुसते जगांत फोटोत या आहो अम्ही
दिसतो जसे श्रीमंत, तैसे जन्मातही नव्हतो अम्ही
फोटोपरी हा चेहराही, केव्हांच नव्हता हांसरा
दोस्त हो, फोटोत आम्ही, मुद्दाम केला हांसरा
रूप तर होते असे, की बघवले नाहीं मला
ना तरी माझी प्रिया ही, सोडून ना जाती मला
बोललो धोक्यांत, मजला मेल्यावरी मारू नका
दोस्तहो जे बोललों ते, आपसातही बोलू नका

११

[ असे म्हणतात की तीर्थ प्रयागी मरण यावे पण : ]
जाऊनही तीर्थप्रयागी, काय ते मिळवीन मी
ऐसे नव्हे, की वेगळा, मृत्यू तिथे पाहीन मी
वाटते, सारेच तिथले, आज मज आहे इथे
गंगा इथे, यमुना इथे, कालही आहे इथे :

मेल्यावरी ही एकदा, मी परतुनी आलो घरी
तेच होते दार आणि तीच होती ओसरी
होती तिथे तसबीर माझी, भिंतीवरी त्या टांगली
खूप होती धूळ, आणि कसर होती लागली
द्रवलो तिला पाहून, होती शेवटी माझीच ती
दिसली, मला पण आज, माझ्या प्रेताहुनी निस्तेज ती
[ या नंतर तसबीर माझ्याशी बोलू लागते, ]
बोलली, की का बरे, नेलेस ना मजला सवे
आहे इथें कां, सांग कोणी, पुसण्यास माझी आसवे
हीच का, होतीं अशी, माझ्या वरीं माया तुझी
टाकुनी गेलास तिजला प्रत्यक्ष जीं छाया तुझीं
बोलली, हेही तुला कां सांगावयाला लागले
मेल्यावरी, जगण्यास वेड्या, खूप कीर्ती लागते
कीटापरी स्वार्थांध, नुसता कैसा तरी जगलास तूं
आहेस कां, केला कुठे, जगण्या विना पुरुषार्थ तू
जीवनीही, ज्यास कोणी संम्मानिले नाही कधी
तसबीरी, त्याच्या कुठे कां, संभाळतो कोणी कधी ?
समजली, आतां तरी ना, आपुली स्वतःची पायरी
समजले ना, काय मिळते, नुसती करोनी शायरी
ओशाळतो ऐकून, नेली, तसबीर मी ती उचलूनी
सांगतो, याची तिथें चर्चाहि ना केलीं कुणी

९

[ मेल्यावर आम्ही कसे दिसतो. हे पहाण्याकरितां आम्हांला प्रत्यक्ष मरावं लागेल असे नाहीं, आज या वृद्धापकाळांत नुसता आरसा बघितला तरी पुरेः ]

आरशांतुन एकटक मज कुणी पाहात होते.
नयनीच होता जीव, बाकी सर्व कांहीं प्रेत होते
सांगू नका, संतादिकानी, मरण त्यांचे पाहिले
दर्पणी, आहे आम्हीही प्रेत अमुचे पाहिले.

१०

[ आमच्या फोटोची दुर्दशा कशीही होवो, फोटोच्या रूपाने जगास फसविण्याची धडपड आमची सुरुच असते आमचे फोटोही आमची वास्तवता दाखवणारे नसतात. ]

: ना कळे तेव्हां कुठें आणि कसा राहीन मी
फोटोतूनी, नुसताच जेव्हां, तुमच्या कडे पाहीन मी
फसविण्या नुसते जगांत फोटोत या आहो अम्ही
दिसतो जसे श्रीमंत, तैसे जन्मातही नव्हतो अम्ही
फोटोपरी हा चेहराही, केव्हांच नव्हता हांसरां
दोस्त हो, फोटोत आम्ही, मुद्दाम केला हांसरा
रूप तर होते असे, की बघवले नाहीं मला
ना तरी माझी प्रिया ही, सोडून ना जाती मला
बोललो धोक्यांत, मजला मेल्यावरी मारू नका
दोस्तहो जे बोललों ते, आपसातही बोलू नका

११

[ असे म्हणतात की तीर्थ प्रयागी मरण यावे पण : ]
जाऊनही तीर्थप्रयागी, काय ते मिळवीन मी
ऐसे नव्हे, की वेगळा, मृत्यू तिथे पाहीन मी
वाटते, सारेच तिथले, आज मज आहे इथे
गंगा इथे, यमुना इथे, कालही आहे इथे :

## : दार्शनिक :

१

[ आम्ही नुसत्या साक्षी रूपाने जगत आहोत. भोंवतालच्या विश्वाकडे आम्ही निर्विकारतेने बघतो आहोंत, बघितले तर पाहिजेच; कारण आम्ही जिवंत आहोत. चिद्रूप आहोंत ]

बोलाविते हे विश्व तेव्हां, विश्वाकडे पाहूं आम्ही
नातरी, नुसतेच आपुले, अपुल्याकडे पाहूं आम्ही
द्रष्टुत्त्व अमुचा धर्म, आम्हां, पाहाण्या कांहीं हवे
ना म्हणू केव्हांच आम्ही, हे नको, अन् ते हवे.

२

[ आम्ही असे जरी बघत असलो तरी बघण्यां पलिकडे या घटनांचा आणि आमचा कांहीं संबंध नाहीं. ]

पाहतो साऱ्या जगा, ऐसे नव्हे ना, पाहतो
पाहातो तैंसेच जैंसे, पाहातो, ना पाहातो
एकही संवेदना या, अंतरी ना राहिली
नुसतीच आहे Lense आतां Film नाहीं राहिली.

३

[ प्रारब्ध योगाप्रमाणें येणाऱ्या परिस्थितीत आम्ही असे साक्षित्वाने वागतो. परिस्थिति निरपेक्ष असे कोणी तरी आम्ही वेगळे आहोत, ही जाणीव

आम्हांला परिस्थितीजन्य दुःखापासून वाचवीत असते. ]

बूटही माझे पुसाया, नव्हती जयाची पात्रता
लेस मी त्यांच्या बूटांची, बांधतो आहे आतां
हांसतो गालांत जेव्हां, येतात नयनी आसवे
कळते मला, की मी खरा, हा हीं नव्हे तो हीं नव्हे

४

[ आम्ही परमेश्वर बघितला नसेल पण विश्वातील सौंदर्य ह्याचेच रूप नव्हे काय ? ]

आहे जरी विश्वांत साऱ्या, सौंदर्य आम्ही पाहिले.
का म्हणू परमेश्वराला, अगदीच नाहीं पाहिले
हे खरे संपूर्ण त्याच्या, रूपास नाहीं पाहिले
हे ही खरे, जे पाहिले; काही कमी ना पाहिले

५

[ वेदान्त समजून त्याचप्रमाणें वागणें हा वेदान्त आहे काय ? ]

कोणीच ना येथे कुणाचा, आम्हासही कळते तसे
दोस्त हो, समजूनहि हे वागायचे नसते तसे
मानू आम्हीं, की सूज्ञतेने, तोच आहे वागला
समजूनहि वेदान्त सारा, नाहीं तसा जो वागला.

६

ना तरी घ्या राख, आणि वाढवा दाढी मिशी
पाहू तरी वदनास तुमच्या, तीही जरा दिसते कशी
जा कुठे मसणात, येथे क्षणमात्रहीं राहू नका
इतके करा आपणासवें इतरासहि नेऊ नका.

७

[ आम्हाला खरी भीति मोक्षाचीच आहे ]

—ना भितो मृत्यूस तैसे, जैसे भितो मोक्षास मीं
समजा तिथे कंटाळलो, काय मग करणार मीं ?
सांगतीं कीं रूक्षतेचा, अंतहीं नाहीं तिथे
सांगतीं ज्ञाते पुनः मरण ही नाहीं तिथे

[ संपूर्ण जीवन म्हणजे एक स्वप्नच नव्हे काय ? ]

८

स्वप्न जैसे जीवनाचे, सारखे मी पाहतो
पाहतो झोपेत तैसे, जागेपणीही पाहतो
खोटे पणा तर सारखा, पाहतो दोहोंत मी
इतुकेच, की या जागृतीचा, वाटतों थोडा कमी
खोटेपणाही जागृतीचा, जेव्हां कधी दिसतो मला
म्हणतो कसा, की "आज काही जागृती आली मला"
अर्थ ही या जागुतीचा ना मला दिसतो कुठे
ऐसे नव्हे, झोपेतही, जागृती नाही कुठे
झोपेतही जर जागृती, मानाल ना, काही तिथें
सांगाल का, की स्वप्न सारे, कोण मग बघतो तिथे
सांगतो इतुक्याच साठी, मी स्वप्न नुसते पाहतो
पाहतो झोपेत, तैसे जागेपणीही पाहतो.

९

[ आम्ही परमेश्वराचे अंश आहोत यांची आम्हाला नुसती जाणीवच आहे असे नाही तर गर्वही आहे ]

तुमचाच आहे अंश भगवन् मी ही कुणी दुसरा नव्हे
लोळण्या पायी तुझ्या, तुमचा कुणी कुत्रा नव्हे
हे खरे ! की आज माझे, प्रारब्ध आहे वेगळी
ना तरी अपुल्यात भगवन काय होते वेगळे.

१०

[ प्रारब्धाचा भोगा शिवाय क्षय होणार नाही ]

भगवन अरे भेटूनिया ही, काय मज देशील तू
मंत्र्या परी येशील, थोडा हासुनी जाशील तू
प्रारब्ध जर अमुचे अम्हाला आहेच हे भोगायचे
आम्ही तरी सांगा कशाला कुंकू तुझे लावायचे.

११

केव्हां तरी प्रारब्ध माझे, संपूर्ण हे भोगून मी
संपदा ऐश्वर्य माझे, सारे पुनः मिळवीन मी
शब्दही या दीनतेचा, जन्मांत ना बोलू कधी
एसे नव्हे, की काळ हा ही, संपायचा नाहीं कधी.

१२

[ आम्ही परमेश्वराला म्हणतो की तुझी जर आठवण शाबूत असती तर तूं आम्हाला विसरला नसतास ]

जेव्हां कधी अमुच्या परि देहांत या आलास तू
झालास तूहि दीन, आणि, ऐसाच हा रडलास तू
थोडा जरी का काळ हाहि, विसरला नसतास तू
सांगतो आम्हास ही, विसरला नसतास तू

१३

जाणतो, हे व्यर्थ आहे, माझे तुझ्याशीं बोलणे
विसरेल जो स्वजनास, सांगा काय त्यासी बोलणे
भगवन्, अरे नुसतीच नाही, आशा तुझी मी सोडली
आज तर आहे स्वतःची, देहबुद्धी सोडली.

## १४

[ दार्शनिक विचारा प्रमाणे चंद्रावरील डागाला आम्ही असे म्हणू :—]

अंतरीचा तम जरासा उजळावयाचा राहिला
आहे अविद्या लेश कांही ज्ञानोत्तरी ही राहिला
इतुका जरी, अध्यात्म कोणी चंद्रांत आहे पाहिला
मानूं आम्ही, त्यानेच आहे चंद्र कांही पाहिला.

## १५

[ भगवान श्री कृष्णाच्या या थट्टेबद्दल माफी असावी ]

सांगशी निष्काम कर्म, कृष्णा अरे वेदांत तूं
समजला की काय आम्हा, किर्लोस्कराचा पंप तूं
मोक्ष हा पुरुषार्थ ऐसे, सांगसी जेथे तिथे
तू तरी देवा कधीहि, आहेस का गेला तिथे
भोगिसी ऐश्वर्य सारे वंदिती इच्छा तुझी
संन्यास पण साऱ्या जगाने घ्यावा अशीं इच्छा तुझी
निष्कामता थोडी जरीं, अंतरी असती तुझ्या
धावुनी साऱ्याच येत्या, आमुच्याकडे गोपी तुझ्या
केली जराशीं दिल्लगी, मानूं नको विपरीत हे
जाणतो मीही प्रभो कांही तुझे खोटे नव्हे.
ऐसे नव्हे, अध्यात्म आम्हा, खोटाच तू सांगीतला
आज तर प्रत्यक्ष अपुल्या जगण्यांत तूं सांगितला
तुज परी हे साधण्याला, आशा तरी कैसी करूं
दिल्लगीं ही ना करू, तर काय मग दुसरे करूं

१६

[ माझ्या मागच्या पुस्तकांत (मराठी शायरी) संसार प्रवाहाला रेल गाडीचे रूपक दिले होते. त्यालाच पत्त्याच्या खेळाचे रूपक कसे दिले आहे ते बघा. स्वतःचे निजरूप विसरून जेव्हां नामरूपात्मक उपाधीचा अभिमान धरला जातो तेव्हांच या सर्व संसाराला सुरवात होते. खेळातील पत्त्यांच्या संसाराची अशीच उत्पत्ति झाली आहे. ज्याला आपण आपला खेळ समजतो तो खेळ खरोखर आपलाच आहे काय? या पत्त्यांच्या खेळांत या खेळाचे मर्म ओळखणारा कोणता पत्ता आहे हे ध्यानांत येते कां बघा. ]

मारतो राजास एक्का नहिल्यास दहिल्या मारतो
कल्पनेचे खेळ सारे, कोणी कुणा ना मारतो
पाहता कोणात कांही, नाहीं कुठेहीं वेगळे
सारेच तुकडे कागदाचे, छाप नुसते वेगळे

१७

[ हे छाप म्हणजेच आपण आहोत असे हे कागदाचे तुकडे समजू लागल्यावर काय झाले ते बघा ]

आता कुठे खेळास कांही रंग येऊ लागला
पत्त्यातला राजा स्वतःला राजाच मानूं लागला
राणींसहि जाणीव काही और होऊं लागली
लाजली नव्हती कधी तीं आज लाजू लागलीं
दीनतेचा खेद आतां दुरींस होंऊं लागला
छक्का म्हणे पंज्यास आतां श्रीमंत वाटूं लागला
विसरुनि निजरूप नुसत्या नामरूपीं गुंतले
भलत्याच काही अवदसेच्या पाशांत आतां गुंतले
नुसता उपाधी भेद कोणी राजा नव्हे राणीं नव्हे
आणखीं सांगू पुढें ? हा खेळही अमुचा नव्हे
खेळतो दुसराच, त्याला पाहिले नाही कुणीं
म्हणतीं तयाला ईश म्हणतीं अल्ला कुणीं येशू कुणी

त्याचा म्हणे हा खेळ नुसते पत्ते आम्हीं पत्त्यातले
एका परीं पत्त्यास कळले. मर्म हे पत्त्यातले
आहे इथें रंगेल कोणी पत्ता असे पत्त्यातला
आहे जसा पत्त्यातला तो नाहीं तसा पत्त्यातला
नामरूपाचा स्वतःच्या पत्ताच ना त्याला कधी
नाहीं कशाची खंत होतो राजा कधीं दुरीं कधी
हासतों नुसताच आहे सर्वांहुनी हा वेगळा
सांगाल का याहून कोणीं वेदान्त काहीं वेगळा
[ पत्त्यांतील या जोकरा सारखे आपल्यासही खेळता येइल कां ? ]
आता पुरे या मैफली हीं शायरीं आता नको
खूप झालीं बेवकूफीं जास्ती तरीं आता नकों
उतरण्या ओठांत आता शब्द सृष्टी लाजली
उतरण्या शब्दांत आता भावना हीं लाजली
कल्पनेचे भावनेशीं सर्व नाते संपले
आज माझ्या शायरीचे विश्व सारे संपले

१८

मूर्तता काव्यांत माझ्या, कोठेच नाही राहिली
राहीली जी काय सारी आसूंत आता राहिलीं
अजवरी शब्दांतुनी मी, बाहवीली शायरी
यापुढें वाहील नुसती, नयनातुनी गालावरी
आज ही तैशीच माझ्या, आहेत नयनी आसवे
वाटे जशी आहेत कोण्या बहिऱ्या मुक्याची आसवे
शायरी नुसत्या परावाणींत आता गायची
सांगाल कां, ही कां, कवी चौघांत असते गायची
यापुढे या मैफलीला, श्री हरी साक्षात हवा
आहे अम्हां विश्वास, घेऊ अशीच त्याची वाहवा.

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
REFBK-0014823
REFBK-0014823